सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९४७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१**

# मुंबई सावकार अधिनियम, १९४६

( दिनांक ३१ डिसेंबर २००५ पर्यंत सुधारलेला )

## Maharashtra Act No. XXXI of 1947

# The Bombay Money-Lenders Act, 1946

( *As modified upto the 31st December 2005* )

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

**२००६**

**[ किंमत : रु. १०.००]**

# सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ३१

## मुंबई सावकार अधिनियम, १९४६

अनुक्रमणिका


पृष्ठे

उद्देशिका.

कलमे.

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. .. .. .. | १ |
| २. | व्याख्या. .. .. .. | २ |
| ३. | महानिबंधक, निबंधक आणि सहायक निबंधक यांची नियुक्ती. .. | ६ |
| ४. | सावकारांची नोंदवही. .. .. .. | ६ |
| ५. | ज्या क्षेत्रासाठी लायसन्स दिलेले असेल त्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी व लायसन्सच्या अटींव्यतिरिक्त इतर रीतीने सावकाराने सावकारीचा धंदा न करणे. | ६ |
| ६. | लायसन्ससाठी अर्ज. .. .. .. | ७ |
| ७. | लायसन्स देणे व नोंदवहीत नाव दाखल करणे. .. .. | ९ |
| ७क. | (वगळण्यात आले) .. .. .. | ९ |
| ७ख. | (वगळण्यात आले) .. .. .. | १० |
| ८. | लायसन्स देण्यास नकार. .. .. .. | १० |
| ८क. | लायसन्स रद्द करण्याचा निबंधकाचा अधिकार. .. .. | १० |
| ९. | लायसन्सची मुदत. .. .. .. | ११ |
| ९क. | तपासणी फी आकारणे. .. .. .. | ११ |
| १०. | सावकार लायसन्स धारण करीत नसल्यास त्यांचे दावे स्थगित करणे. .. | ११ |
| ११. | (वगळण्यात आले) .. .. .. | ११ |
| १२. | लायसन्स रद्द करण्याकरिता अर्ज. .. .. .. | १२ |
| १३. | महानिबंधक, निबंधक व सहायक निबंधक यांस दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे. | १२ |
| १३क. | कागदपत्र व दस्तऐवज सादर करण्यास फर्मावण्यास प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार. | १२ |
| १३ख. | कायदेशीर लायसन्सशिवाय सावकारीचा धंदा चालविणाऱ्या सावकाराकडे तारण दिलेल्या मालमत्तेचा विनियोग. | १३ |
| १४. | लायसन्स रद्द करण्याचा किंवा निलंबित करण्याचा न्यायालयाचा अधिकार. | १३ |
| १५. | लायसन्स निलंबित किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीही भरपाई न मिळणे. .. | १४ |
| १६. | लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आल्याच्या कालावधीत व्यक्तींना धंदा करण्यास मनाई. | १४ |
| १७. | ज्या व्यक्तीचे लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आले असेल तिने लायसन्सवरील पृष्ठांकनाचा व अपात्रतेचा तपशील दिल्यावाचून अर्ज न करणे. | १५ |

## अनुक्रमणिका


| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| १८. | हिशेब ठेवणे व प्रती सादर करणे हे सावकाराचे कर्तव्य असणे. .. | १५ |
| १९. | सावकाराने लेखा विवरणपत्र व त्याच्या प्रती देणे. | १६ |
| १९क. | ऋणको व सहायक निबंधक यास पुरविण्यात आलेल्या विवक्षित विवरणपत्रांसाठी फी. | १६ |
| २०. | लेख्यांची अचूकता कबूल करणे हे ऋणकोस बंधनकारक असणार नाही. | १७ |
| २१. | कर्जासंबंधीच्या दाव्यात न्यायालयांनी अनुसरावयाची कार्यपद्धती. .. | १७ |
| २२. | शासनाने सूट दिलेल्या कंपनीस किंवा असंस्थापित संस्थेने दिलेल्या कर्जास विवक्षित कलमांच्या तरतुदी लागू नसणे. | १७ |
| २३. | विवक्षित बाबतीत वसूल करण्याजोग्या व्याजाच्या मर्यादा ठरविण्याचा अधिकार. | १७ |
| २४. | हुकूमनाम्याची रक्कम हप्त्याने देण्यासाठी निदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार. | १७ |
| २५. | व्याजाच्या दरांबाबत मर्यादा. .. .. .. | १८ |
| २६. | सावकारांनी कर्जाच्या संबंधातील खर्च आकारण्यास मनाई. .. | १८ |
| २७. | कर्ज अभिहस्तांकित केल्यावर द्यावयाची नोटीस व माहिती. .. .. | १९ |
| २८. | अभिहस्तांकितीच्या बाबतीत अधिनियम लागू असणे. .. .. | १९ |
| २९. | व्यवहार पुन्हा चालू करणे. .. .. .. | १९ |
| ३०. | हिशेब ठेवणे व देय असलेली रक्कम ठरविणे याबाबत चौकशी. .. | २० |
| ३१. | सावकारास देय असलेली रक्कम न्यायालयात ठेव म्हणून ठेवणे. .. | २० |
| ३१क. | पूर्ण महिन्याचे व्याज केव्हा द्यावयाचे. .. .. .. | २० |
| ३२. | बंधपत्र इत्यादीत चुकीच्या रकमेची नोंद करणे हा अपराध असणे. .. | २१ |
| ३२क. | खोटे विधान करण्याबद्दल शास्ती. .. .. .. | २१ |
| ३२ख. | खोट्या नावाने लायसन्स मिळविणे, कायदेशीर लायसन्सशिवाय सावकारीचा व्यवसाय करणे आणि खोट्या नावाने सावकारीचा व्यवसाय करताना करारनामा करणे याबद्दल शास्ती. | २१ |
| ३३. | विनयभंग केल्याबद्दल शास्ती. .. .. .. | २१ |
| ३४. | शास्तीसंबंधी सर्वसाधारण तरतुदी. .. .. .. | २२ |
| ३५. | महामंडळ इत्यादींकडून झालेले अपराध. .. .. .. | २२ |
| ३५क. | विवक्षित अपराध दखल घेण्यायोग्य असणे. .. .. | २३ |
| ३५ख. | विवक्षित अपराधांची दखल घेणे. .. .. .. | २३ |
| ३५ग. | (वगळण्यात आले) .. .. .. | २३ |
| ३६. | पैशासंबंधीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना ऋणको शेतकऱ्यांना अटक किंवा कैद करण्यास बंदी. | २३ |
| ३७. | प्रत्येक अधिकारी लोकसेवक असणे. .. .. .. | २३ |
| ३८. | सन १९४७ चा अधिनियम क्रमांक २८ याच्या तरतुदींची व्यावृत्ती. .. | २४ |
| ३८क. | अधिकारांच्या प्रत्यायोजनाचा राज्य शासनाचा अधिकार. .. .. | २४ |
| ३९. | नियम. .. .. .. | २४ |
| ४०. | निरसन व व्यावृत्ती. .. .. .. | २५ |
| | अनुसूची (वगळण्यात आली) .. .. .. | २६ |

[ मुंबई सावकार अधिनियम, १९४६]†

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१[१].

**[३१ मे, १९४७]**

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३.

सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६. (२९-७-१९७६) ††

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. (२८-७-१९७७)††

[२][मुंबई राज्यातील] सावकारीच्या व्यवहाराचे नियमन करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** [२][मुंबई राज्यात] सावकारीच्या व्यवहारांचे नियमन करण्यासाठी व नियंत्रण ठेवण्यासाठी अधिक चांगली तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी** याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :---

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई सावकार अधिनियम, १९४६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

[३][(२) तो, संपूर्ण [४][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.]

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **मुंबई शासन राजपत्र, १९४८,** भाग पाच, पृ. ९७, निवड समितीच्या अहवालासाठी त्याचेच पृष्ठ २३९, विधानसभेतील कामकाजासाठी बॉम्बे लेजिस्लेटिव असेंब्ली डिबेट, १९४६, भाग नऊ आणि परिषदेतील कामकाजासाठी बॉम्बे लेजिस्लेटिव कौन्सिल डिबेटस्, १९४७, भाग बारा पहा.

२ "मुंबई प्रांत" या शब्दाऐवजी हे शब्द सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० च्या कलम ४ (अ) अन्वये दाखल करण्यात आले.

३ मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) (१) अन्वये दाखल करण्यात आले.

४ "मुंबई प्रांत" या शब्दाऐवजी हे शब्द महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आले.

† हा अधिनियम बाकीच्या मुंबई राज्यास लागू करण्यात आला.
(सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० चे कलम २ पहा.)

†† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

(३) तो [१][राज्य] शासन शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [२][याबाबत जो दिनांक नेमील अशा दिनांकास पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात अंमलात येईल आणि मुंबई राज्याच्या ज्या भागास मुंबई सावकार (एकसूत्रता आणणे व सुधारणा करणे याबाबत) अधिनियम, १९५९ अन्वये तो लागू करण्यात आला असेल अशा भागात, राज्य शासन, त्याच रीतीने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, याबाबत जो दिनांक नेमील अशा इतर दिनांकास तो अंमलात येईल.] १९५९ चा मुंबई पन्नास.

व्याख्या. २. विषयात किंवा संदर्भात काही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमात—

[३][ (१) " बँक " म्हणजे बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली बँक व्यवसाय कंपनी, आणि त्यात,— १९४९ चा दहा.

(एक) भारताच्या रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ अन्वये रचना करण्यात आलेली भारताची रिझर्व बँक ; १९३४ चा दोन.

(दोन) भारताच्या स्टेट बँकेबाबत अधिनियम, १९५५ अन्वये रचना करण्यात आलेली भारताची स्टेट बँक ; १९५५ चा तेवीस.

(तीन) भारताच्या स्टेट बँकेबाबत (दुय्यम बँक) अधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे दुय्यम बँक ; १९५९ चा अडतीस.

(चार) बँकिंग कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० अन्वये रचना करण्यात आलेली तत्सम नवीन बँक ; आणि १९७० चा पाच.

(पाच) बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ५१ अन्वये केन्द्र सरकारने अधिसूचित केलेली इतर कोणतीही बँक व्यवसाय संस्था ; १९४९ चा दहा.

यांचा समावेश होतो ;]

(२) " सावकारीचा धंदा " म्हणजे पैसे कर्जाऊ देण्याचा [४][— मग ते रोखीने असोत किंवा वस्तुरूपाने असोत—] धंदा,—मग तो धंदा कोणत्याही इतर धंद्याच्या संबंधात झालेला असो अगर नसो— किंवा त्या धंद्याचा जोडधंदा म्हणून असो अगर नसो ;

(३) " भांडवल " म्हणजे सावकारीच्या धंद्यात सावकार जी रक्कम गुंतवितो ती रक्कम ;

[५][(४) " कंपनी " म्हणजे कंपन्यांबाबत अधिनियम, १९५६ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली कंपनी ;] १९५६ चा एक.

---

[१] " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] हा मजकूर सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (ब) (दोन) अन्वये दाखल करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ च्या कलम २ (अ) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[४] हे शब्द, सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ च्या कलम २ (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

[५] खंड (४) हा सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ कलम २(क) अन्वये दाखल करण्यात आला.

१९६१ चा महाराष्ट्र चोवीस. (५) " सहकारी संस्था " म्हणजे [1][महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०] किंवा सहकारी संस्था अधिनियम, १९१२ किंवा इतर कोणत्याही [2][राज्य] विधानमंडळाने सहकारी संस्थांसंबंधी केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये नोंदणी केलेली किंवा नोंदणी केल्याचे समजण्यात येणारी संस्था ;

१९१२ चा दोन. [3][ (५क) " तपासणी फी " म्हणजे सावकाराच्या लेखापुस्तकांची तपासणी करण्याबाबत कलम ९-अ, अन्वये आकारणीयोग्य असलेली फी ;]

(६) " व्याज " या संज्ञेत, कर्जाबाबतचा मोबदला म्हणून किंवा अन्यथा सावकारास मुद्दल रकमेच्यावर दिलेल्या किंवा देण्यायोग्य अशा रकमेचा समावेश होतो, मग ती कोणत्याही नावाने संबोधिलेली असो ; परंतु तीत ह्या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदी अनुसार सावकाराने परिव्यय ; आकार व खर्च याबाबत किंवा यासाठी कायदेशीररीत्या आकारलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश होत नाही ;

(७) " लायसन्स " म्हणजे या अधिनियमान्वये दिलेले लायसन्स ;

(८) " लायसन्स फी " म्हणजे कोणत्याही लायसन्सबाबत देय असलेली फी ;

(९) " कर्ज " म्हणजे [4]* * * * कर्ज म्हणून व्याजाने दिलेला पैसा किंवा इतर वस्तू, परंतु तीत पुढील गोष्टींचा समावेश होत नाही—

(क) शासकीय डाकघर बँकेत किंवा इतर कोणत्याही बँकेत किंवा कंपनीत किंवा सहकारी संस्थेत ठेवलेला पैसा किंवा इतर मालमत्ता ;

१९६० चा २१. (ख) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० किंवा सार्वजनिक, धार्मिक किंवा धर्मादायविषयक उद्देशासंबंधीचा कोणताही इतर अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही संस्थेला किंवा संघाला दिलेले किंवा संस्थेने किंवा संघाने दिलेले कर्ज किंवा संस्थेकडे किंवा संघाकडे ठेवलेली अनामत रक्कम ;

(ग) शासनाने किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने दिलेले कर्ज ;

[5][ (गग) शासकीय कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी किंवा त्यांना मदत देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आणि राज्य शासनाने मंजूर केलेल्या निधीतून शासकीय कर्मचाऱ्याला दिलेले कर्ज ; ]

(घ) सहकारी संस्थेने दिलेले कर्ज ;

---

[1] हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ च्या कलम २(ड) अन्वये, " मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ किंवा त्या अधिनियमासारखा जो कोणताही विधि अंमलात असेल त्या अन्वये " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[2] " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[3] खंड (५अ) हा सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० च्या कलम ४ (क) अन्वये दाखल करण्यात आला.

[4] हा मजकूर सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २(२)(अ) अन्वये वगळण्यात आला.

[5] खंड (कक) सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४(क) (४) अन्वये दाखल करण्यात आला.

[१][ (घ१) भविष्यनिर्वाह निधीच्या वर्गणीदारास किंवा ठेवीदारास त्या निधीत त्याच्या खाती जमा असलेल्या रकमेतून निधीच्या नियमांस अनुसरून दिलेली आगाऊ रक्कम ;

(घ२) विमा अधिनियम, १९३८ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे विमा कंपनीस किंवा विमा कंपनीने दिलेले कर्ज ;] १९३८ चा सहा.

(ङ) [२] * * * बँकेस दिलेले किंवा बँकेने दिलेले कर्ज ;

[३][ (ङ·ङ·) राज्यामध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये संस्थापित केलेल्या कोणत्याही संस्थेला (अशी संस्था या खंडाच्या कोणत्याही इतर तरतुदीखाली न येणारी संस्था असेल) दिलेले किंवा अशा संस्थेकडून घेतलेले कर्ज किंवा अशा संस्थेकडे ठेवलेली ठेव ;]

(च) परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ यात दिलेल्या व्याख्येत येणाऱ्या वचनपत्राव्यतिरीक्त (प्रॉमिसरी नोट) इतर परक्राम्य संलेखाच्या आधारे दिलेली [४][तीन हजार रुपयांपेक्षा अधिक होणारी कोणतीही] कर्जाऊ रक्कम ; १८८१ चा सव्वीस.

[५][ (च-१) (इंग्रजीत किंवा कोणत्याही भारतीय भाषेत लिहिलेल्या) हुंडीच्या आधारे दिलेली, तीन हजार रुपयांपेक्षा अधिक होणारी कोणतीही कर्जाऊ रक्कम ;

(च-२) पैसे कर्जाऊ देणे हे ज्याचे प्राथमिक उद्दिष्ट नसेल असा कोणताही व्यवसाय करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने खरीखुरी कर्जाऊ दिलेली रक्कम (जर अशी कर्जाऊ रक्कम त्यांच्या व्यवसायाच्या नेहमीच्या ओघात देण्यात आली असेल तर); ]

[६][ (छ) कलमे २३ व २५ यांच्या प्रयोजनांसाठी असेल त्या व्यतिरिक्त,

[७] * * * *

[७] * * * *

(तीन) पिकासाठी पैसा पुरविण्याकरिता किंवा हंगामी पैसा पुरविण्याकरिता, कुळाने धारण केलेल्या जमिनीपैकी दर एकरामागे रु. ५० पेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचे जमीन मालकाने आपल्या कुळास दिलेले कर्ज ;

[८][ (चार) शेतमजुरास त्याच्या मालकाने दिलेले कर्ज ;]

**स्पष्टीकरण**.— " कूळ " म्हणजे, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ [९][किंवा शेतजमिनींच्या कुळवहिवाटीसंबंधी अंमलात असलेला इतर कोणताही संबद्ध कुळवहिवाटीचा कायदा] यात त्यास नेमून दिलेला अर्थ ; आणि " पिकासाठी पैसा पुरविणे " व " हंगामी पैसा पुरविणे " या १९४८ चा मुंबई सदुसष्ट.

---

[१] हा उपखंड सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २(१) अन्वये दाखल करण्यात आला.

[२] " अनुसूचित " हा शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २ (२) (ब) अन्वये वगळण्यात आला.

[३] उप-खंड (इइ) सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २ अन्वये दाखल करण्यात आला.

[४] १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम १०, कलम २ (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] हे उपखंड वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

[६] हा उपखंड मूळ उपखंडाऐवजी सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २ (२) (क) अन्वये दाखल करण्यात आला.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ अन्वये बाबी (एक) व (दोन) वगळण्यात आल्या.

[८] बाब (चार) ही, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (क) (४) अन्वये दाखल करण्यात आली.

[९] हे शब्द वरील अधिनियमानुसार दाखल करण्यात आले.

या शब्दप्रयोगांचा अर्थ मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७ यात त्यांना नेमून दिल्याप्रमाणे असेल ;]

(१०) " सावकार " म्हणजे—

(क) जी व्यक्ती किंवा जे [१][राज्यात] सावकारीचा धंदा करते/करतात ; किंवा

(ख) जिचे अगर ज्यांचे धंद्याचे मुख्य ठिकाण राज्यात आहे—

(एक) अशी व्यक्ती, किंवा

(दोन) असे अविभक्त हिंदु कुटुंब, किंवा

[२][ * * * ]

[३][ (तीन क) अशी कंपनी, किंवा]

(चार) [४][अशा व्यक्तीची असंस्थापित संस्था, आणि त्यात तारण व्यवसायीचा समावेश होतो, परंतु पुढील गोष्टींचा समावेश होत नाही :—

(एक) शासन ;

(दोन) स्थानिक प्राधिकरण ;

(तीन) बँक ;

१९६३. चा दहा. (चार) कृषि पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ अधिनियम, १९६३ अन्वये रचना करण्यात आलेले कृषि पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ ;

(पाच) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशी इतर कोणतीही बँक व्यवसाय संस्था, वित्तीय संस्था किंवा कोणतीही संस्था;]

[५][ (१०क) " तारण व्यवसायी " म्हणजे जो आपल्या सर्वसामान्य व्यवहारात कर्ज देतो आणि अशा कर्जाच्या परतफेडीसाठी तारण म्हणून वस्तू गहाण ठेवून घेतो असा सावकार;]

(११) " विहित " म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले ;

(१२) कर्जाच्या संबंधात " मुद्दल " म्हणजे कर्जदारास प्रत्यक्ष कर्जाऊ दिलेली रक्कम ;

१९२५ चा एकोणीस. [६][ (१२-क) " भविष्य निर्वाह निधी " म्हणजे भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ यात व्याख्या केलेला भविष्य निर्वाह निधी आणि त्यात उक्त अधिनियमात व्याख्या केलेल्या शासकीय भविष्य निर्वाह निधी व रेल्वे भविष्य निर्वाह निधी यांचाही समावेश होतो;]

[७][ (१३) " राज्य " म्हणजे [८][महाराष्ट्र राज्य];]

(१३क) " मान्यताप्राप्त भाषा " म्हणजे बृहन्मुंबईत मराठी किंवा गुजराती आणि इतर ठिकाणी न्यायालयाची भाषा ;

(१४) " नोंदवही " म्हणजे कलम ४ अन्वये सावकारांनी ठेवलेली नोंदवही ;

---

[१] " प्रांतात " या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २ (३) अन्वये उप-खंड (३) वगळण्यात आला.

[३] हा खंड सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २(२) अन्वये दाखल करण्यात आला.

[४] " अशी व्यक्तींची असंस्थापित मंडळी " या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम २ (फ) अन्वये दाखल करण्यात आला.

[५] खंड (१०अ) सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० च्या कलम ४ (क) (५) अन्वये दाखल करण्यात आला.

[६] हा खंड सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २ (३) अन्वये दाखल करण्यात आला.

[७] मूळ खंडाऐवजी हा खंड सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (क) (६) अन्वये दाखल करण्यात आला.

[८] " मुंबई राज्य " या शब्दाऐवजी हे शब्द महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आले.

(१५) " नियम " म्हणजे या अधिनियमाखालील नियम ;

[1][ * * * * *]

(१७) " हा अधिनियम ज्यास लागू आहे असा दावा ", म्हणजे —

(क) हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकानंतर दिलेल्या कर्जाच्या वसुलीकरिता,

(ख) उक्त दिनांकापूर्वी किंवा नंतर दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या संबंधात हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकानंतर घेतलेल्या कोणत्याही तारणाची किंवा केलेल्या कोणत्याही कराराची अंमलबजावणी करण्याकरिता ; किंवा

(ग) उक्त दिनांकापूर्वी किंवा नंतर देण्यात आलेल्या कोणत्याही कर्जाच्या संबंधात हा अधिनियम अंमलात आल्यांच्या तारखेनंतर दिलेल्या कोणत्याही तारणाच्या विमोचनार्करिता ; केलेला कोणताही दावा किंवा कारवाई ;

(१८) " व्यापारी " म्हणजे, जी धंद्याच्या नित्याच्या व्यवहारात माल किंवा इतर मालमत्ता, मग ती स्थावर असो वा जंगम असो,– यांची खरेदी व विक्री करते अशी व्यक्ती आणि त्यात–

| | |
|---|---|
| घाऊक किंवा किरकोळ व्यापारी, | माल तयार करणारा, |
| कमिशन एजंट, | कंत्राटदार, |
| दलाल, | कारखानदार, |

यांचा समावेश होतो, परंतु त्यात कारागिराचा किंवा जी व्यक्ती आपले शेतीचे उत्पन्न किंवा गुरे विकते किंवा आपल्या उपयोगांसाठी शेतीचे उत्पन्न किंवा गुरे विकत घेते अशा व्यक्तींचा समावेश होत नाही. १९४८ चा मुंबई ६७

**स्पष्टीकरण**.—या खंडाच्या प्रयोजनासाठी " कारागीर " म्हणजे, जी निकटपूर्वीच्या बारा महिन्यांतील कोणत्याही एका दिवशी वस्तुनिर्माण प्रक्रियेत दहाहून अधिक कामगार कामावर ठेवीत नाही अशी व्यक्ती.

महानिबंधक, निबंधक आणि सहायक निबंधक यांची नियुक्ती.

**३.** [2][राज्य] शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींची–मग त्या सरकारी अधिकारी असोत किंवा नसोत-सावकारांचे महानिबंधक, निबंधक आणि सहायक निबंधक म्हणून नियुक्ती करता येईल आणि अशा प्रत्येक अधिकाऱ्याने ज्या क्षेत्रात आपल्या अधिकारांचा वापर करावयाचा आणि आपली कर्तव्ये बजावावयाची अशी क्षेत्रे ठरविता येतील. १९४७ चा मुंबई २७

सावकारांची नोंदवही.

**४.** प्रत्येक सहायक निबंधक आपल्या अधिकारितेखाली असलेल्या क्षेत्रासाठी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात सावकारांची एक नोंदवही ठेवील :

[3][परंतु, मुंबई सावकार (एकसूत्रता आणणे व सुधारणा करणे याबाबत) अधिनियम, १९५९ अन्वये हा अधिनियम ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आला असेल अशा कोणत्याही क्षेत्रात या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी उक्त क्षेत्रात ठेवलेली अशी कोणतीही नोंदवही ही, हा अधिनियम किंवा त्या अन्वये केलेले नियम, यांच्याशी जेथवर विसंगत नसेल तेथवर, ती या अधिनियमान्वये ठेवण्यात आली आहे असे समजण्यात येईल.] १९५९ चा मुंबई ५०

ज्या क्षेत्रासाठी लायसन्स दिलेले असेल त्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी व लायसन्सच्या अटी व्यतिरिक्त इतर रीतीने सावकाराने सावकारीचा धंदा न करणे.

**५.** कोणत्याही सावकाराने, त्याला ज्या क्षेत्रासाठी लायसन्स दिलेले असेल त्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर ठिकाणी आणि अशा लायसन्सच्या अटी व शर्ती यांव्यतिरिक्त इतर रीतीने सावकारीचा धंदा करता कामा नये.

---

[1] खंड (१६) सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २ (४) अन्वये वगळण्यात आला.

[2] " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[3] हे परंतुक सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (ड) अन्वये दाखल करण्यात आले.

**६.** (१) प्रत्येक सावकाराने [1][[2]ज्या ठिकाणी तो सावकारीचा धंदा करीत असेल किंवा तो करण्याचा त्याचा इरादा असेल ते ठिकाण ज्या क्षेत्राच्या हद्दीत असेल] त्या क्षेत्राच्या सहायक निबंधकाकडे लायसन्स मिळण्याकरिता दरवर्षी, विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी, विहित केलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे. जेव्हा तो एकापेक्षा अधिक ठिकाणी असा धंदा करीत असेल किंवा असा धंदा करण्याचा त्याचा इरादा असेल तेव्हा अशा प्रत्येक ठिकाणासाठी स्वतंत्र अर्ज अशा सहायक निबंधकाकडे केला पाहिजे.] लायसन्ससाठी अर्ज.

अशा अर्जात पुढील तपशील असला पाहिजे :—

(क) अशा सावकाराचा ज्या नावाने धंदा चालविण्याचा इरादा असेल ते [3][खरे नाव] आणि धंद्याच्या व्यवस्थेबद्दल जबाबदार म्हणून योजिलेल्या व्यक्तीचे [3][खरे नाव] ;

(ख) जर असा अर्ज, --

(एक) एखाद्या व्यक्तीने किंवा व्यक्तीतर्फे केलेला असेल तर, अशा व्यक्तीचे [3][खरे नाव] व पत्ता ;

(दोन) एखाद्या अविभक्त कुटुंबाने किंवा कुटुंबातर्फे केलेला असेल तर अशा कुटुंबाचा कर्ता व कुटुंबातील प्रौढ समदायाद यांची [3][खरी नावे] व पत्ते ;

(तीन) [4][एखाद्या कंपनीने किंवा कंपनीतर्फे] केलेला असेल तर, तिचे संचालक, व्यवस्थापक किंवा तिची व्यवस्था पाहणारा व्यवस्थापन अधिकारी यांची [3][खरी नावे] व पत्ते ;

(चार) व्यक्तींच्या असंस्थापित संस्थेने किंवा संस्थेतर्फे केलेला असेल तर, अशा व्यक्तींची [3][खरी नावे] व पत्ते ;

(ग) [5][राज्यातील] ज्या क्षेत्रात ज्या ठिकाणी किंवा मुख्य ठिकाणी सावकारीचा धंदा चालविण्यात येतो ते क्षेत्र, ठिकाण किंवा मुख्य ठिकाण ;

(घ) [5][राज्यातील] ज्या कोणत्याही इतर ठिकाणी सावकारीचा धंदा चालविण्यात येतो किंवा चालविण्याचा इरादा असेल त्या ठिकाणाचे नाव ;

(ङ) अशा अर्जावर सही करणाऱ्या व्यक्तीने स्वतः किंवा अविभक्त हिंदू कुटुंबातील समुदायादांपैकी कोणीही किंवा, यथास्थिति, ज्या [6][[7]* *कंपनीच्या] वतीने असा अर्ज करण्यात आला असेल तिच्या कोणत्याही संचालकाने, व्यवस्थापकाने किंवा व्यवस्थापन अधिकाऱ्याने किंवा ज्या असंस्थापित संस्थेच्या वतीने असा अर्ज करण्यात आला असेल त्या संस्थेतील कोणत्याही व्यक्तीने, अर्जाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांक ३१ मार्च रोजी संपणाऱ्या वर्षात [5][राज्यात] व्यक्तिशः, किंवा भागीदारीने किंवा दुसऱ्या कोणत्याही सहभागीदाराच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या जोडीने त्याच किंवा दुसऱ्या कोणत्याही नावाने सावकारीचा धंदा चालविला आहे किंवा कसे ते ;

---

[1] हा मजकूर सन १९४८ चा मुंबई अधिनियम ५८, कलम ३ (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[2] हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम ३ (अ) (एक) अन्वये बदली दाखल करण्यात आला.

[3] "नाव" आणि "नावे" या शब्दांऐवजी हे शब्द सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम ३ (अ) (दोन) अन्वये दाखल करण्यात आले.

[4] "एखादी बँक किंवा कंपनी" या शब्दांऐवजी हा मजकूर सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३ (१) (अ) अन्वये दाखल करण्यात आला.

[5] "प्रांतातील" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[6] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (१) (ब) आणि (क) अन्वये दाखल करण्यात आला.

[7] "बँकेच्या किंवा" हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३ (१) (ब) अन्वये वगळण्यात आले.

(च) ज्या वर्षासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या वर्षात सावकारीच्या धंद्यात जे एकूण भांडवल गुंतविण्याचा अशा व्यक्तीचा इरादा असेल ते भांडवल ;

[१][ (छ) सावकारीचा धंदा चालविण्याची ठिकाणे एकाहून अधिक असतील तर, अशा प्रत्येक ठिकाणी धंद्याची व्यवस्था पाहण्यासाठी ज्या व्यक्ती असतील त्यांची [२][खरी नावे] ].

(२) असा अर्ज लेखी करण्यात आला पाहिजे व त्यावर–

(क) (एक) तो अर्ज एका व्यक्तीने केलेला असल्यास, त्या व्यक्तीकडून,

(दोन) जर तो अर्ज अविभक्त हिंदू कुटुंबातर्फे केलेला असेल तर, अशा कुटुंबाच्या कर्त्याकडून [३] * *.

(तीन) जर तो अर्ज [४][[५] * * * कंपनीने] किंवा असंस्थापित संस्थेने केलेला असल्यास, व्यवस्थापन संचालकाकडून किंवा [६][भाग ब राज्याव्यतिरिक्त भारताच्या इतर प्रदेशात] असलेले तिचे धंद्याचे मुख्य ठिकाण भारताच्या [७][परंतु [८][मुंबई राज्याची] सौराष्ट्र व हैद्राबाद क्षेत्रे धरून] किंवा ज्या क्षेत्रात तिचा धंदा चालविण्याचा इरादा असेल त्या क्षेत्रांतील तिचे धंद्याचे ठिकाण ज्याच्या नियंत्रणाखाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून ; किंवा

(ख) सावकाराने स्वतः किंवा कुटुंबाने किंवा [९][[१०] * * कंपनीने] किंवा, यथास्थिति, असंस्थापित संस्थेने याबाबत ज्यास मुखत्यारनामा देऊन प्राधिकृत केले असेल अशा एजन्टाकडून सही करण्यात आली पाहिजे.

(३) अशा अर्जात विहित करण्यात येईल असा इतर तपशीलही असला पाहिजे.

[११][[१२][ (४) प्रत्येक अर्जासोबत [१३][दोनशे] रुपये लायसन्स फी पाठविली पाहिजे :

परंतु असे की, नियमांद्वारे विहित केलेल्या कालावधीच्या समाप्तीनंतर, अर्ज करण्यात येईल त्या बाबतीत अर्जासोबत [१४][चारशे] रुपये लायसन्स फी पाठविली पाहिजे.]

---

१ नवीन खंड (ग) सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (एक) (अ) अन्वये दाखल करण्यात आला.

२ "नाव" या शब्दाऐवजी हे शब्द सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम ३ (अ) (दोन) अन्वये दाखल करण्यात आले.

३ "किंवा प्रौढ सहभागीदाराने" हे शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (२) (अ) अन्वये वगळण्यात आले.

४ मूळ शब्दांऐवजी हे शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (२) (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

५ "बँकेने किंवा" हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३ (२) अन्वये वगळण्यात आले.

६ हा मजकूर, मूळ मजकुराऐवजी विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

७ हा मजकूर सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४(२) अन्वये दाखल करण्यात आला.

८ "मुंबई राज्याची" हे शब्द फेरबदल न केलेल्या स्वरूपातच राहतील. [महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.]

९ "बँकेने" या शब्दाऐवजी हा शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (२) (ब) अन्वये दाखल करण्यात आला.

१० "बँकेने किंवा" हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३ (२) अन्वये वगळण्यात आले.

११ पोट-कलमे (४) व (५) सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, याच्या कलम ३ (तीन) अन्वये समाविष्ट करण्यात आली.

१२ हे पोट-कलम (४) मूळ पोट-कलमाऐवजी सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम ३ (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

१३ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, याच्या कलम २ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

१४ वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

(५) या कलमान्वये द्यावयाची फी विहित केलेल्या रीतीने भरण्यात आली पाहिजे व [१][ * * * ] अर्ज मागे घेण्यात आला तरीसुद्धा ती परत देण्यात येणार नाही.]

**७.** [२][ (१) ] कलम ६ अन्वये केलेला अर्ज मिळाल्यावर [३][ * * * ] सहायक निबंधक आपल्या प्रतिवृत्तासह असा अर्ज निबंधकाकडे पाठवील. निबंधकास, [४][या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून,] योग्य वाटेल अशी, कोणतीही असल्यास, आणखी चौकशी केल्यानंतर, अर्जदारास विहित केलेल्या नमुन्यात व विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, [५][ * * * ] लायसन्स देता येईल आणि कलम ४ अन्वये त्याने ठेवलेल्या नोंदवहीत अशा अर्जदाराचे नाव दाखल करण्याविषयी सहायक निबंधकास निदेश देता येईल. लायसन्स देणे व नोंदवहीत नाव दाखल करणे.

[६][ * * * ]

[७][परंतु, निबंधक, संबंधित ग्रामसभेशी आणि संबंधित पंचायतीशी विचारविनिमय केल्यानंतर, आणि अनुज्ञप्तीची व्याप्ती एकापेक्षा अधिक ग्रामसभांमध्ये आणि पंचायतींमध्ये असेल त्याबाबतीत ज्यांच्या अधिकारितेच्या क्षेत्रात सावकार सावकारीचा धंदा करीत असेल किंवा सुरू करण्याच्या विचारात असेल अशा सर्व संबंधित ग्रामसभांशी व पंचायत समितींशी विचारविनिमय केल्यानंतर अनुसूचित क्षेत्रामध्ये अशी अनुमती देईल :

परंतु आणखी असे की, संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी ह्या बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय संबंधित पंचायत समितींवर बंधनकारक राहील.

**स्पष्टीकरण.**—या परंतुकाच्या प्रयोजनासाठी,—

१९५९ चा महा. ३ (एक) " ग्रामसभा ", " पंचायत " व " अनुसूचित क्षेत्रे " या शब्दप्रयोगांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील ;

(दोन) " पंचायत समिती " या शब्दप्रयोगाचा अर्थ महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यामध्ये नेमून दिल्याप्रमाणे असेल.]

**७-क.** [लायसन्स देण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र.] १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ अन्वये वगळण्यात आले.

---

[१] " लायसन्स नाकारण्यात आले अगर " हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ च्या कलम ३ (क) अन्वये वगळण्यात आला.

[२] कलम ७ ला पोट-कलम (१) हा सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८च्या कलम १ अन्वये नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] " व विहित केलेल्या रीतीप्रमाणे संक्षिप्त चौकशी केल्यावर " हे शब्द सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ च्या कलम ४ (अ) (एक) अन्वये वगळण्यात आले.

[४] हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६च्या कलम ४ (अ) (दोन) अन्वये दाखल करण्यात आला.

[५] हा मजकूर सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८च्या कलम ४ (१) अन्वये वगळण्यात आला.

[६] " जर रजिस्ट्रारच्या " या शब्दांनी सुरू होणारा आणि " देण्यात आले पाहिजे " या शब्दांनी संपणारा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६च्या कलम ४ (अ) (तीन) अन्वये वगळण्यात आला.

[७] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १० द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

**७-ख.** [प्रमाणपत्राचे निलंबन व ते रद्द करणे.] १९७७ चा महा. अधि. क्र. २०, कलम ३ अन्वये वगळण्यात आले.

लायसन्स देण्यास नकार.

**८.** (१) पुढील कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणावरून लायसन्स देणे नाकारण्यात येणार नाही :—

(क) अर्जदार किंवा त्याचा सावकारीचा धंदा चालविण्यास जबाबदार असलेली किंवा जबाबदार म्हणून योजिलेली व्यक्ती लायसन्स धारण करण्यास अपात्र आहे ;

(ख) लायसन्स मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जासंबंधीच्या या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा नियमांचे अर्जदारने पालन केलेले नाही [१][ * * * * ]

(ग) या अधिनियमान्वये करावयाच्या कोणत्याही गोष्टीचे पालन करण्यात अर्जदाराने बुद्धीपुरस्सर कसूर केली आहे किंवा त्याचा भंग होईल असे वर्तन जाणूनबुजून केले आहे.

(घ) अर्जदार किंवा सावकारीचा धंदा चालविण्यास जबाबदार असलेल्या किंवा जबाबदार म्हणून योजिलेल्या कोणत्याही व्यक्तीने—

(एक) सावकारीचा धंदा करताना किंवा त्या धंद्याच्या संबंधात एखादे फसवणुकीचे किंवा अप्रामाणिकपणाचे कृत्य करण्यात जाणूनबुजून भाग घेतला आहे किंवा त्याकडे डोळेझाक केली आहे ; किंवा

(दोन) ती, भारतीय दंड संहितेचे प्रकरण सतरा किंवा प्रकरण अठराची कलमे ४६५, ४७७ किंवा ४७७-क यांखालील अपराधाबद्दल दोषी असल्याचे आढळून आले आहे.

[२][(२) पोट-कलम (१) अन्वये लायसन्स नाकारण्यापूर्वी निबंधक, अर्जाच्या पुष्ट्यर्थ कोणताही पुरावा असल्यास तो सादर करण्याची आणि लायसन्स का नाकारण्यात येऊ नये याबद्दल कारणे दर्शविण्याची वाजवी संधी देईल आणि त्याजकडे आलेल्या पुराव्याची आणि असे लायसन्स नाकारण्याबद्दलच्या त्याच्या कारणांची नोंद करील.]

(३) पोट-कलम (१) अन्वये निबंधकाने ज्या आदेशान्वये लायसन्स देण्यास नकार दिला असेल त्या आदेशावर महानिबंधकाकडे अपील करण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

लायसन्स रद्द करण्याचा निबंधकाचा अधिकार.

[३][**८-क.** (१) ज्या व्यक्तीस लायसन्स देण्यात आले असेल ती व्यक्ती, ज्या कोणत्याही कृतिबद्दल किंवा वर्तणुकीबद्दल कलम ८ अन्वये तिला लायसन्स देण्याचे निबंधकाने नाकारले असते व जे कृत्य किंवा जी वर्तणूक लायसन्स देण्याच्या वेळी त्याच्या नजरेस आणून दिली गेली नव्हती, अशा कोणत्याही कृत्याबद्दल अथवा वर्तणुकीबद्दल दोषी आहे या कारणावरून अशा लायसन्सच्या कालावधीत निबंधकास ते लेखी आदेशान्वये रद्द करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये लायसन्स रद्द करण्यापूर्वी निबंधक लायसन्स धारण करणाऱ्या व्यक्तीस लेखी नोटीस देईल आणि त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये निबंधकाने ज्या आदेशान्वये लायसन्स रद्द केले असेल त्या आदेशावर महानिबंधकाकडे अपील करता येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.]

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०च्या कलम ४ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] हे पोट-कलम सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ४ (फ) अन्वये दाखल करण्यात आले.

[३] नवीन कलम ८-अ हे सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ५ अन्वये दाखल करण्यात आले.

९. लायसन्स ज्या दिनांकास दिले असेल त्या दिनांकापासून त्यानंतरच्या ३१ जुलैपर्यंत ते अंमलात राहील. [1][परंतु, विहित केलेल्या मुदतीत लायसन्सच्या नवीकरणासाठीचा अर्ज सहायक निबंधकाकडे येईल त्याबाबतीत, अर्ज अंतिमरित्या निकालात काढण्यात येईपर्यंत लायसन्स कायदेशीर असल्याचे समजण्यात येईल.] लायसन्सची मुदत.

[2][९-क. (१) लायसन्सचे नवीकरण करून घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या सावकाराकडून कलम ६ अन्वये घ्यावयाच्या लायसन्स फीव्यतिरिक्त ज्या मुदतीसाठी लायसन्सचे नवीकरण करून घ्यावयाचे असेल त्या मुदतीत त्याने गुंतविलेल्या [3][कमाल भांडवलाच्या एक टक्का दराने] [4][किंवा [5][पाच हजार रुपये] यांपैकी जी कमी असेल ती] तपासणीची फी वसूल करण्यात आली पाहिजे. तपासणी फी आकारणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये द्यावयाची तपासणी फी देण्यात कसूर केल्यास, ती कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी " कमाल भांडवल " म्हणजे लायसन्सच्या मुदतीत कोणत्याही दिवशी भांडवलाची जो जास्तीत जास्त रक्कम सावकारीच्या धंद्यात गुंतलेली राहिल ती रक्कम.]

१०. [6][(१) ज्यास हा अधिनियम लागू होतो असा वाद ज्याच्याशी संबंधित असेल असे कर्ज किंवा त्याचा कोणताही भाग देण्यात आला त्यावेळी सावकार कायदेशीर लायसन्स धारण करीत होता याबद्दल न्यायालयाची खात्री झाली असल्याखेरीज कोणत्याही न्यायालयाने, अशा कोणत्याही वादामध्ये [ मुंबई सावकार (सुधारणा) अधिनियम, १९७५ याच्या प्रारंभापूर्वी न्यायालयापुढे अनिर्णित असलेल्या अशा वादासह] सावकाराच्या नावे हुकूमनामा काढता कामा नये, आणि सावकार कायदेशीर लायसन्स धारण करीत नव्हता याबद्दल न्यायालयाची खात्री झाल्यास, त्याने वाद फेटाळला पाहिजे.] सावकार लायसन्स धारण करीत नसल्यास त्याचे दावे स्थगित करणे. (१९७५ चा महा. ७५.)

(५) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे—

(क) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी सावकाराने दिलेल्या कर्जाबाबतच्या दाव्यांना बाध येणार नाही ;

(१९०९ चा ३. १९२० चा ५. १९५६ चा १.) [7][(ख) इलाखा शहरे नादारी अधिनियम, १९०९ किंवा प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० किंवा अंमलात असलेल्या इतर कोणत्याही तत्सम कायद्याच्या उपबंधान्वये पाल्याधिकरणास, किंवा अधिकृत अभिहस्तांकितीस किंवा धारकास किंवा प्रशासकास किंवा न्यायालयास किंवा कंपन्यांबाबत अधिनियम, १९५६ अन्वये परिसमापकास सावकारची मालमत्ता ताब्यात घेण्याचे जे अधिकार आहेत त्या अधिकारांना बाध येणार नाही.]

११. [8][ * * * ]

---

[1] हे परंतुक सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (ग) अन्वये दाखल करण्यात आले.

[2] कलम ९अ, वरील अधिनियमाच्या कलम ४ (ह) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[3] " कमाल भांडवलावर अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या दराने " या मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम ७ अन्वये दाखल करण्यात आला.

[4] १९७७ चा महा. अधि. २०, कलम ४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९९२ चा अधिनियम क्रमांक ७, याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[6] पोट-कलम (१) हे, पोट-कलम (१) ते (४) ऐवजी सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम ८ अन्वये दाखल करण्यात आले.

[7] मूळ खंडाऐवजी हा खंड सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (आय) अन्वये दाखल करण्यात आला.

[8] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ अन्वये कलम ११ वगळण्यात आले.

लायसन्स रद्द करण्याकरिता अर्ज.

**१२.** (१) ज्या कृत्यावरून किंवा वर्तणूकीवरून निबंधकाला कलम ८ अन्वये लायसन्स नाकारता येईल असे कोणतेही कृत्य किंवा वर्तणूक केल्याबद्दल सावकार दोषी आहे. या कारणावरून त्यास दिलेले लायसन्स रद्द करण्यात यावे म्हणून लायसन्सची मुदत चालू असताना, कोणत्याही व्यक्तीस महानिबंधकाकडे अर्ज करता येईल. अशा व्यक्तीने असा अर्ज करताना महानिबंधकास योग्य वाटेल अशी, शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम अनामत म्हणून ठेवली पाहिजे.

(२) असा अर्ज व अनामत रक्कम मिळाल्यावर [१][किंवा कलम १३-क अन्वये काम करणाऱ्या अधिकाऱ्याकडून त्यासंबंधीचे प्रतिवृत्त मिळाल्यावर] महानिबंधकाने चौकशी केली पाहिजे आणि असे कृत्य किंवा वर्तणूक केल्याबद्दल सावकार दोषी आहे अशी त्याची खात्री झाल्यास, त्यास सावकाराचे लायसन्स रद्द करण्याविषयी आणि पोट-कलम (१) अन्वये अनामत ठेवलेली रक्कम परत करण्याविषयी निबंधकास निदेश देता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये केलेला अर्ज थिल्लर किंवा तापदायक आहे असे महानिबंधकाचे मत झाल्यास, त्यास पोट-कलम (१) अन्वये अनामत ठेवलेल्या रकमेतून योग्य वाटेल इतकी रक्कम भरपाई म्हणून सावकाराला देण्यासाठी अर्जदारास निदेश देता येईल.

महानिबंधक, निबंधक व सहायक निबंधक यांस दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

**१३.** (१) [२][ कलम ७ व कलम १३-क यांच्या प्रयोजनाकरिता निबंधक, सहायक निबंधक आणि यथास्थिति कलम १३-क अन्वये प्राधिकृत केलेला अधिकारी ] व कलम १२ च्या प्रयोजनांसाठी महानिबंधक यास पुढील बाबतीत दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ अन्वये जे अधिकार दिवाणी न्यायालयाकडे निहित असतील तेच अधिकार असतील व त्यास त्यांचा वापर करता येईल :—

१९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे व शपथेवर त्याची तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तू हजर करण्यास भाग पाडणे ;

(ग) साक्षिदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे पाठविणे ; आणि

(घ) प्रतिज्ञालेखांवरून गोष्टी सिद्ध करणे.

कागदपत्र व दस्तऐवज सादर करण्यास फर्मावण्यास प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार.

[३][**१३-क.** सावकारीचा धंदा ह्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार चालविण्यात येत आहे किंवा नाही त्याची पडताळणी करण्यासाठी कोणत्याही निबंधकास, सहायक निबंधकास किंवा याबाबतीत [४][राज्य] शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणत्याही सावकारास [५][किंवा ज्या व्यक्तीच्या संबंधात, निबंधक, सहायक निबंधक किंवा अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास ती व्यक्ती राज्यात सावकारीचा धंदा चालवीत आहे असे सकारण वाटल्यास त्या व्यक्तीस] त्याच्या मते त्या प्रयोजनाशी संबंधित असलेला तिच्या ताब्यातील अभिलेख व दस्तऐवज सादर करण्यास फर्माविता येईल आणि त्यानंतर अशा सावकाराने [६][किंवा अशा व्यक्तीने] असा अभिलेख किंवा दस्तऐवज सादर केला पाहिजे. वाजवी नोटीस दिल्यानंतर, अशा निबंधकास, सहायक निबंधकास किंवा अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास कोणत्याही योग्य वेळी जेथे जसा अभिलेख किंवा दस्तऐवज आहे असे त्यास वाटेल अशा [७][कोणत्याही ठिकाणी अधिपत्राशिवाय प्रवेश करता येईल] [८][आणि अशा अभिलेखाचे किंवा दस्तऐवजाचे निरीक्षण करता येईल] आणि अशा अभिलेखाचा अर्थ लावण्यासाठी किंवा त्याची पडताळणी करण्यासाठी प्रश्न विचारता येतील.]

---

[१] हा मजकूर सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (जे) अन्वये दाखल करण्यात आला.

[२] हा मजकूर, " कलम ७ च्या प्रयोजनांकरिता रजिस्ट्रार व सहाय्यक रजिस्ट्रार " या मजकुराऐवजी सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (के) अन्वये दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ६ अन्वये नवीन कलम १३-अ दाखल करण्यात आले.

[४] " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[५] हा मजकूर सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २ (अ) अन्वये दाखल करण्यात आला.

[६] हे शब्द, वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

[७] ' वाटेल त्या त्या जागेत प्रवेश करण्याचा' या मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम १० (अ) अन्वये दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १० (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][**१३-ख.** (१) कलम १३-क अन्वये केलेल्या अभिलेखांच्या व दस्तऐवजांच्या निरीक्षणानंतर सावकाराने कायदेशीर लायसन्सशिवाय चालविलेल्या सावकारी धंद्यामध्ये दिलेल्या कर्जाकरिता ऋणकोने त्याच्याकडे तारण म्हणून ठेवलेली मालमत्ता सावकाराच्या कब्जात असल्याबद्दल निरीक्षक अधिकाऱ्याची खात्री झाल्यास, निरीक्षक अधिकाऱ्याने अशा मालमत्तेचा कब्जा ताबडतोब त्याच्या स्वाधीन करण्यास सावकारास फर्माविले पाहिजे.

कायदेशीर लायसन्सशिवाय सावकारीचा धंदा चालवणाऱ्या सावकाराकडे तारण दिलेल्या मालमत्तेचा विनियोग.

(२) निरीक्षक अधिकाऱ्याने, तो, जर निबंधक नसेल तर, मालमत्तेचा कब्जा त्याच्या स्वाधीन करण्यात आल्यानंतर, ती निबंधकाच्या ताब्यात दिली पाहिजे आणि निबंधकाने (तो जेव्हा निरीक्षक अधिकारीदेखील असेल तेव्हा) तिचा यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे विनियोग करण्यासाठी ती स्वतःच्या अभिरक्षेत ठेवली पाहिजे.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये मालमत्ता स्वाधीन करण्यात आल्यानंतर निबंधकाने, तिची उचित पडताळणी केल्यानंतर व ओळख पटवल्यानंतर ती, ज्या ऋणकोने तारण दिली असेल त्याला किंवा ऋणको मरण पावला असेल त्या बाबतीत त्याच्या ज्ञात वारसांना परत केली पाहिजे.

(४) ऋणको किंवा त्याचे ज्ञात वारस यांचा शोध लागत नसेल तर, निबंधकाने मालमत्तेचा कब्जा घेतल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, विहित रीतीने, त्यासंबंधीच्या दाव्यांची मागणी करणारी नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे. उक्त कालावधी संपण्यापूर्वी, नोटीशीला उत्तर म्हणून किंवा अन्यथा, दावा प्राप्त झाल्यास तो अशा दाव्यावर अभिनिर्णय देऊन तो निकालात काढील. कोणताही दावा कायदेशीर असल्याबद्दल निबंधकाची खात्री झाली तर, तो दावा करणाऱ्या व्यक्तीस मालमत्तेचा कब्जा, तिने त्यासाठी पावती दिल्यानंतर देईल, आणि दावा करणाऱ्या व्यक्तीस अशा रीतीने मालमत्ता दिल्याने निबंधक इतर कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात, अशा मालमत्तेबाबतच्या त्याच्या दायित्वातून मुक्त होईल. जर दावा नाकारण्यात आला तर मालमत्तेचे राज्य शासनाकडे समपहरण होईल.

(५) ऋणकोने तारण म्हणून दिलेल्या मालमत्तेचा कब्जा कोणत्याही कारणामुळे (तिची ओळख पटण्याच्या कारणासह) त्याला देणे शक्य नसेल त्याबाबतीत, ज्या सावकाराकडे ती तारण म्हणून देण्यात आली होती त्यास, ऋणकोला किंवा तो मरण पावला असल्यास त्याच्या ज्ञात वारसाला अशा मालमत्तेचे मूल्य, अशा ऋणकोने किंवा, यथास्थिति, वारसाने मालमत्तेचा दावा केल्यास, देण्यास भाग पाडण्यात येईल. सावकाराने मूल्य देण्यात कसूर केल्यास जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे त्याची वसुली करता येईल, आणि मूल्याच्या वसुलीनंतर ते, ज्याने अशी मालमत्ता तारण म्हणून दिली होती त्या ऋणकोस किंवा, यथास्थिति, त्याच्या वारसास देण्यात येईल.

(६) सावकार आणि ऋणको किंवा, यथास्थिति, त्याचा वारस यांच्यामध्ये मालमत्तेच्या मूल्यासंबंधी किंवा तिची ओळख पटण्यासंबंधीच्या प्रश्नावर मतभेद होईल तर तो प्रश्न निर्णयासाठी निबंधकाकडे निर्दिष्ट केला जाईल आणि त्या प्रश्नावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(७) मालमत्तेचे मूल्य, राज्य शासनाने त्या बाबतीत नेमलेल्या तज्ज्ञाच्या सेवेचे सहाय्य घेऊन ठरवता येईल. तज्ज्ञास राज्य शासन किंवा त्याने नेमलेल्या, तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसणारा कोणताही अधिकारी, कोणत्याही क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या संबंधात, वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे ठरवील असे मानधन देता येईल.]

**१४.** (१) (एक) या अधिनियमाखालील अपराध केल्याबद्दल सावकाराविरूद्ध अपराधसिद्धीचा आदेश देणाऱ्या न्यायालयास ; किंवा

लायसन्स रद्द करण्याचा किंवा निलंबित करण्याचा न्यायालयाचा अधिकार.

(दोन) हा अधिनियम ज्या दाव्यास लागू आहे तो दावा चालविणाऱ्या न्यायालयाची अशी खात्री झाली की, अशा सावकाराने या अधिनियमाच्या तरतुदींचा अगर नियमांचा भंग केल्यामुळे न्यायालयाच्या मते तो सावकारीचा धंदा करण्यास लायक नाही त्या न्यायालयास पुढीलप्रमाणे आदेश देता येईल व घोषित करता येईल—

(क) अशा सावकाराने [2][राज्यात] धारण केलेली सर्व लायसन्से न्यायालयास योग्य वाटेल इतक्या मुदतीपर्यंत रद्द किंवा निलंबित करण्यात यावी असा आदेश देता येईल ; आणि

---

[1] कलम १३-ख हे सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम ११ अन्वये दाखल करण्यात आले.

[2] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

(ख) त्यास योग्य वाटल्यास, असा सावकार किंवा जर असा सावकार अविभक्त हिंदू कुटुंब, [१][ [२] * * कंपनी] किंवा असंस्थापिक संस्था असेल तर असे कुटुंब, [१][ [२] * * कंपनी] किंवा संस्था, तसेच अशा कुटुंबाने [३][ [४] * * कंपनी] किंवा संस्थेने चालविलेल्या सावकारीच्या धंद्याची व्यवस्था पाहण्यास जबाबदार असलेली कोणतीही व्यक्ती ही न्यायालयास योग्य वाटेल इतक्या मुदतीपर्यंत [५][राज्यात] लायसन्स धारण करण्यास अपात्र आहे असे घोषित करता येईल.

(२) जेव्हा न्यायालय ह्या अधिनियमाखालील अपराधाबद्दल सावकारास सिद्धापराध ठरवील किंवा पोट-कलम (१), खंड (क) किंवा (ख) अन्वये आदेश देईल किंवा घोषित करील त्या बाबतीत अपराधसिद्धीच्या आदेशाचा किंवा घोषणेचा तपशील सिद्धापराध ठरविलेल्या सावकाराने धारण केलेल्या सर्व लायसन्सवर किंवा अशा आदेशाशी किंवा घोषणेशी संबंध असलेल्या व्यक्तींनी धारण केलेल्या सर्व लायसन्सवर न्यायालयाने पृष्ठांकित केला पाहिजे आणि आपल्या आदेशाच्या किंवा घोषणांच्या प्रती, ज्याने अशी लायसन्से दिली होती त्या निबंधकाकडे असा तपशील नोंदवह्यामध्ये दाखल करण्यासाठी पाठवून दिला पाहिजे :

परंतु, कोणत्याही सावकाराने धारण केलेले कोणतेही लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आले असेल किंवा या कलमान्वये कोणतेही लायसन्स धारण करण्यास कोणताही सावकार अपात्र ठरेल त्या बाबतीत त्यास, असा आदेश देणाऱ्या न्यायालयाच्या निर्णयावर सर्वसाधारणपणे ज्या न्यायालयाकडे अपील करता येते त्या न्यायालयाकडे अशा आदेशावर अपील करता येईल आणि असा आदेश देणाऱ्या न्यायालयास किंवा अपील न्यायालयास योग्य वाटल्यास ह्या कलमान्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी अपिलाचा निर्णय होईपर्यंत स्थगित करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये पृष्ठांकनासाठी न्यायालयाने मागितलेले कोणतेही लायसन्स, ते धारण करणारी व्यक्ती न्यायालय निर्दिष्ट करील अशा रीतीने व अशा मुदतीच्या आत सादर करील व जी कोणतीही व्यक्ती अशा रीतीने मागितलेले लायसन्स बाजवी कारणाशिवाय सादर करण्यात कसूर करील तिला, अपराधसिद्धीनंतर, ज्या मुदतीत अपराध चालू राहील त्या मुदतीतील प्रत्येक दिवसाबद्दल जास्तीत जास्त रु. ५०० पर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(४) या कलमान्वये न्यायालयास प्रदान करण्यात येणाऱ्या अधिकारांचा वापर, अपिलाची सुनावणी करताना किंवा पुनरीक्षण करताना कोणत्याही न्यायालयास करता येईल.

लायसन्स निलंबित किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीही भरपाई न मिळणे.

**१५.** या अधिनियमान्वये कोणतेही लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आले असेल त्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीस भरपाई मिळण्याचा किंवा लायसन्स फी परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आल्याच्या कालावधीत व्यक्तींना धंदा करण्यास मनाई.

**१६.** या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार ज्या व्यक्तीचे लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आले असेल ती व्यक्ती ज्या कालावधीपर्यंत लायसन्स निलंबित किंवा, यथास्थिति, रद्द करण्यात आले असेल त्या कालावधीत [५][राज्यात] कोणतेही लायसन्स धारण करण्यास अपात्र आहे असे समजण्यात येईल.

---

१ "बँक" या शब्दाऐवजी हा शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ७ अन्वये दाखल करण्यात आला.

२ "बँक" हा शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ४ अन्वये वगळण्यात आला.

३ "बँकेने" या शब्दाऐवजी हा शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८ अन्वये दाखल करण्यात आला.

४ "बँकेने" हा शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ अन्वये वगळण्यात आला.

५ "प्रांतात" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

**१७.** कलम १४ अन्वये ज्या व्यक्तीच्या लायसन्सवर पृष्ठांकन केलेले असेल किंवा जी व्यक्ती लायसन्स धारण करण्यास अपात्र ठरविण्यात आली असेल त्या व्यक्तीने अशा पृष्ठांकनाचा किंवा अपात्रतेचा तपशील दिल्याशिवाय ती व्यक्ती लायसन्स मिळण्यासाठी अर्ज करणार नाही किंवा ती लायसन्स धारण करण्यास पात्र होणार नाही.

*ज्या व्यक्तीचे लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आले असेल तिने लायसन्सवरील पृष्ठांकनाचा व अपात्रतेचा तपशील दिल्या वाचून अर्ज न करणे.*

**१८.** (१) प्रत्येक सावकाराने विहित केलेल्या नमुन्यात व विहित केलेल्या रीतीने एक रोकडवही व खातेवही ठेवली पाहिजे.

*हिशेब ठेवणे व प्रती सादर करणे हे सावकाराचे कर्तव्य असणे.*

(२) प्रत्येक सावकाराने—

(क) (एक) ज्या तारखेस कर्ज दिले त्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत कोणत्याही मान्यताप्राप्त कर्जाची रक्कम, ते काढल्याची व त्याची मुदत भरण्याची तारीख, कर्जाची प्रतिभूती असल्यास तिचे स्वरूप, ऋणको व सावकाराचे नाव व पत्ता व आकारलेला व्याजाचा दर ही सुवाच्य व स्पष्ट शब्दांत दर्शविणारे एक विवरणपत्र ऋणकोच्या स्वाधीन केले पाहिजे किंवा ते त्याच्या स्वाधीन करण्याची व्यवस्था केली पाहिजे ;

[१][परंतु, सावकाराने ऋणकोस पासबुक पुरविले असेल त्या बाबतीत असे विवरणपत्र ऋणकोस देणे आवश्यक असणार नाही. हे पासबुक विहित नमुन्यात असले पाहिजे आणि त्यात ऋणकोशी केलेल्या व्यवहारांचा अद्ययावत हिशेब नमूद करण्यात आला पाहिजे] ;

(दोन) उक्त मुदतीत [२][ खंड (अ) (एक) मध्ये निर्दिष्ट केलेला तपशील असणारे विवरणपत्र] सहायक निबंधकाकडे पाठविले पाहिजे किंवा पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे ;

(ख) कर्जाची पूर्णपणे फेड झाल्यावर, ऋणकोने स्वाक्षरित केलेल्या प्रत्येक कागदावर कर्जाची फेड झाली आहे किंवा ते रद्द झाले आहे याबद्दल खोडता न येण्यासारखी नोंद केली पाहिजे आणि प्रतिभूती म्हणून ऋणकोने दिलेले गहाण मुक्त केले पाहिजे, त्याचे तारण परत केले पाहिजे, प्रत्येक लेख परत केला पाहिजे आणि प्रत्येक अभिहस्तांकनपत्र रद्द केले पाहिजे किंवा ते पुन्हा अभिहस्तांकित केले पाहिजे.

[३][(२-क) पोट-कलम (२), खंड (क) (दोन) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास लेखी आदेशाद्वारे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वर्गातील सावकारांना एक विवरणपत्र सहायक निबंधकाला देण्याविषयी परवानगी देता येईल. या विवरणपत्रात आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत दिलेल्या सर्व कर्जाच्या संबंधात पोट-कलम (१), खंड (क) (एक) मध्ये उल्लेख केलेला तपशील असला पाहिजे. असा आदेश देण्यात आल्यावर या पोट-कलमात तरतूद केल्याप्रमाणे नियतकालिक विवरणपत्र सादर करणे ज्याने पसंत केले असेल अशा सावकाराने, अशी प्रत्येक मुदत संपल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत ते विवरणपत्र सादर केले पाहिजे किंवा ते सादर करण्याविषयी व्यवस्था केली पाहिजे.]

(३) कोणत्याही सावकाराने कोणत्याही कर्जाच्या संबंधात ऋणकोने दिलेल्या रकमेबद्दल साध्या व स्पष्ट शब्दांतील संपूर्ण अशी पावती दिल्याशिवाय ऋणकोकडून कोणतीही रक्कम स्वीकारता कामा नये.

(४) कोणत्याही सावकाराने, कर्जाबद्दल ऋणकोने गहाण, तारण किंवा प्रतिभूति म्हणून दिलेली कोणतीही वस्तू त्यास पावती दिल्याशिवाय स्वीकारता कामा नये. अशा पावतीत वरील वस्तुचे वर्णन, तिची अंदाजी किंमत, तिच्यावर दिलेल्या कर्जाची रक्कम व विहित करण्यात येईल असा इतर तपशील असला पाहिजे, व ती साध्या व स्पष्ट शब्दांत लिहिलेली असून ती सावकाराकडून स्वाक्षरित करण्यात आली पाहिजे. [४][अशा सावकाराने अशा पावत्यांच्या दुसऱ्या प्रतींची नोंद वेगळ्या नोंदवहीत केली पाहिजे.]

---

[१] हे परंतुक सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम २ (अ) अन्वये दाखल करण्यात आले.

[२] "उक्त विवरणपत्राची प्रत" या शब्दांऐवजी हे शब्द सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम २ (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

[३] हे पोट-कलम सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

[४] हा मजकूर सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४(ल) अन्वये दाखल करण्यात आला.

सावकाराने लेखा विवरणपत्र व त्याच्या प्रती देणे.

**१९.** (१) प्रत्येक सावकाराने दरवर्षी आपल्या प्रत्येक ऋणकोस त्याच्याकडे येणे असलेल्या कोणत्याही रकमेच्या हिशेबांचे सुवाच्य विवरणपत्र दिले पाहिजे, किंवा ते त्यास देण्याची व्यवस्था केली पाहिजे त्यावर सावकाराची किंवा त्याच्या एजन्टाची स्वाक्षरी असली पाहिजे. तसेच त्यात पुढील गोष्टी दर्शविलेल्या असल्या पाहिजेत—

[१][(एक) वर्षाच्या सुरुवातीस सावकाराला येणे असलेल्या मुद्दलाची रक्कम, व्याजाची रक्कम व कलम १९-अ मध्ये उल्लेखिलेल्या फीची रक्कम ह्या त्यात वेगवेगळ्या नमूद केलेल्या असल्या पाहिजेत ;

(दोन) त्या वर्षात दिलेल्या कर्जाची एकूण रक्कम ;

(तीन) त्या वर्षात परतफेडीची मिळालेली एकूण रक्कम ;

(चार) वर्षाच्या शेवटी येणे असलेल्या मुद्दलाच्या व व्याजाच्या रकमा.]

विवरणपत्र सावकाराकडून किंवा त्याच्या एजन्टाकडून स्वाक्षरित करण्यात येईल आणि ते कोणत्याही मान्यताप्राप्त भाषेतील असेल. ते विहित केलेल्या नमुन्यात असले पाहिजे आणि विहित करण्यात येईल अशा तारखेस किंवा तत्पूर्वी ऋणकोकडे पाठविण्यात आले पाहिजे :

[२][परंतु, सावकाराने ऋणकोस पासबुक पुरविले असेल त्या बाबतीत, असे विवरणपत्र ऋणकोस देणे आवश्यक असणार नाही. हे पासबुक विहित नमुन्यात असले पाहिजे आणि त्यात ऋणकोशी केलेल्या व्यवहाराचा अद्ययावत हिशेब नमूद करण्यात आला पाहिजे.]

सावकाराने उक्त तारखेस किंवा त्यापूर्वी [३][खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील असणारे विवरणपत्र] सहायक निबंधकाकडे पाठविले पाहिजे किंवा पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या पूर्वी किंवा तदनंतर दिलेल्या कोणत्याही विशिष्ट कर्जाच्या बाबतीत, त्या कर्जाची किंवा त्याच्या भागाची फेड करण्यात आलेली नसेल त्या कालावधीत कोणत्याही वेळी ऋणकोने लेखी मागणी केल्यास व विहित केलेली फी दिल्यास ऋणकोस किंवा त्याची तशी इच्छा असल्यास त्याने मागणीत विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस, सावकाराने कोणत्याही मान्यताप्राप्त भाषेत लिहिलेले हिशेबाचे विवरणपत्र पुरविले पाहिजे. अशा विवरणपत्रात पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला संपूर्ण तपशील असला पाहिजे व त्यावर सावकाराची किंवा त्याच्या एजन्टाची स्वाक्षरी असली पाहिजे.

(३) ऋणकोने लेखी मागणी केल्यावर व खर्चाची विहित रक्कम दिल्यावर सावकाराने त्यास दिलेल्या कर्जासंबंधी किंवा त्याबाबतच्या प्रतिभूतिसंबंधी दस्तऐवजाची प्रत ऋणकोस किंवा त्याची तशी इच्छा असल्यास त्या मागणीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीस पुरविली पाहिजे.

(४) या कलमाच्या प्रयोजनाकरिता ' वर्ष ' म्हणजे सावकार सर्वसाधारणपणे ज्या वर्षाकरिता आपल्या स्वतःच्या वह्यांत हिशेब ठेवतो ते वर्ष.

ऋणको व सहायक निबंधक यांस पुरविण्यात आलेल्या विवक्षित विवरणपत्रांसाठी फी.

[४][**१९-क.** (१) कलम १८, पोट-कलम (२) किंवा कलम १९, पोट-कलम (१) अन्वये ऋणकोस पुरविलेल्या विवरणपत्राबद्दल [५][किंवा पासबुकाबद्दल] व उक्त पोट-कलमान्वये अशा विवरणपत्राच्या प्रती सहायक निबंधकास पुरविल्याबद्दल [६][किंवा कलम १८, पोट-कलम (२-क) अन्वये ऋणकोस विवरणपत्राच्या प्रती पुरविल्याबद्दल] सावकारास ऋणकोकडून फी वसूल करता येईल.

(२) अशी फी प्रत्येक ऋणकोगणिक दरवर्षी विहित करण्यात येईल अशा दरांनी व रीतीने कमाल दोन रुपये या मर्यादेपर्यंत वसूल करता येईल, मग संबंधित वर्षात ऋणकोस किंवा सहायक निबंधकास पुरविलेल्या विवरणपत्रांची किंवा त्याच्या प्रतींची संख्या कितीही असो.]

---

[१] मूळ खंड (एक) ते (चार) ऐवजी हे खंड वरील अधिनियमाच्या कलम ४(म) अन्वये दाखल करण्यात आले.

[२] हे परंतुक सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ३(अ) अन्वये दाखल करण्यात आले.

[३] " अशा प्रत्येक विवरणाची प्रत " या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ३(ब) अन्वये दाखल करण्यात आला.

[४] कलम १९-अ हे सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ८ अन्वये दाखल करण्यात आले.

[५] हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ७(१) अन्वये दाखल करण्यात आले.

[६] हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) अन्वये दाखल करण्यात आला.

**लेख्याची अचूकता कबूल करणे हे ऋणकोस बंधनकारक असणार नाही.**

**२०.** कलम १९ अन्वये लेखा विवरणपत्र [१][किंवा पासबुक] ज्यास पुरविण्यात आले आहे अशा ऋणकोस ते बरोबर आहे की नाही ते कबूल किंवा नाकबूल करणे हे बंधनकारक असणार नाही आणि त्याने तसे करण्यात कसूर केल्यास त्याच कारणावरून त्याचे लेखे बरोबर आहेत अशी कबुली दिली असे समजण्यात येणार नाही.

**कर्जासंबंधीच्या दाव्यात न्यायालयांनी अनुसरावयाची कार्यपद्धती.**

**२१.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहोही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम ज्यास लागू आहे अशा कोणत्याही दाव्यात—

(क) गुणवत्तेवरून दाव्याचा निर्णय देण्यापूर्वी न्यायालयाने, कलम १८ व १९ यांच्या तरतुदींचे सावकाराने पालन केले आहे किंवा नाही हा वादप्रश्न ठरवून त्याचा निर्णय केला पाहिजे ;

(ख) सावकाराने कलम १८ किंवा १९ याच्या तरतुदींचे पालन केलेले नाही असे न्यायालयास आढळून आल्यास, न्यायालयास, वादीचा दावा पूर्णपणे किंवा अंशतः शाबीत झाला असल्यास, प्रकरणाच्या परिस्थितीअनुसार, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, देय असलेले सर्व व्याज किंवा त्याचा कोणताही भाग नामंजूर करता येईल व त्याचा खर्च नामंजूर करता येईल.

**स्पष्टीकरण.**—सावकाराने दिलेल्या पावतीत किंवा पुरविलेल्या लेखा विवरणपत्रात [२][किंवा पासबुकात] कोणत्याही चुका आणि लोपने असली तरी, अशा चुका आणि लोपने महत्त्वाची नाहीत किंवा लबाडीने करण्यात आलेली नाहीत असे न्यायालयास आढळून आल्यास, ज्या सावकाराने विहित केलेल्या नमुन्यात व विहित केलेल्या रीतीने पावती दिलेली असेल किंवा असे विवरणपत्र किंवा पासबुक पुरविले असेल त्याने,कलम १८ किंवा, यथास्थिति, कलम १९ याच्या तरतुदींचे पालन केले आहे असे समजण्यात येईल.

**शासनाने सूट दिलेल्या [४][[५] * * कंपनीस] किंवा असंस्थापित संस्थेने दिलेल्या कर्जास विवक्षित कलमांच्या तरतुदी लागू नसणे.**

**२२.** [३][राज्य] शासनाने, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे ज्या कोणत्याही [४][[५] * * कंपनीस] किंवा असंस्थापित संस्थेस कलमे १८ ते २१ च्या तरतुदींपासून सूट देण्यात आली असेल त्या कंपनीने किंवा संस्थेने दिलेल्या कर्जाच्या बाबतीत त्या कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

**विवक्षित बाबतीत वसूल करण्याजोग्या व्याजाच्या मर्यादा ठरविण्याचा अधिकार.**

**२३.** कोणत्याही करारात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहोही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही न्यायालयाने हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या संबंधात हुकूमनाम्याच्या तारखेस जी मुद्दलाची रक्कम देय असेल त्यापेक्षा अधिक रक्कम व्याज म्हणून देण्याबद्दल हुकूमनामा काढता कामा नये.

**हुकूमनाम्याची रक्कम हप्त्याने देण्यासाठी निदेश देण्याचा न्यायालयाचा अधिकार.**

१९०८ चा ५. **२४.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये काहोही अंतर्भूत असले तरी, न्यायनिर्णीत ऋणकोने अर्ज केल्यावर हुकूमनामा धारण करणाऱ्या व्यक्तीस नोटीस दिल्यानंतर कोणत्याही वेळी, न्यायालयास असा निदेश देता येईल की, कर्जाबाबत न्यायालयाने न्यायनिर्णीत ऋणकोविरुद्ध दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यात नमूद केलेली रक्कम--मग तो हुकूमनामा हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा नंतर दिलेला असो--पुढीलप्रमाणे म्हणजे न्यायनिर्णीत ऋणकोची परिस्थिती व हुकूमनाम्यात नमूद केलेली रक्कम लक्षात घेऊन न्यायालयाने योग्य ठरविलेल्या हप्त्यांनी व त्या दिनांकास आणि योग्य शर्तीस अनुसरून देण्यात आली पाहिजे.

---

[१] हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ८ अन्वये दाखल करण्यात आले.

[२] हे शब्द वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये दाखल करण्यात आले.

[३] मूळ शब्दांऐवजी हे शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, अन्वये दाखल करण्यात आले.

[४] "बँकेस किंवा" व "बँकेने किंवा" हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ अन्वये वगळण्यात आले.

[५] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

व्याजाच्या दरांबाबत मर्यादा.

**२५.** (१) [१][राज्य] शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणत्याही स्थानिक क्षेत्राकरिता किंवा सावकारीच्या धंद्याच्या वर्गाकरिता प्रतिभूत केलेल्या किंवा न केलेल्या कर्जाच्या बाबतीत व्याजाचे कमाल दर वेळोवेळी निश्चित करता येतील.

[२][ * * * *]

[३][ (१-क) कोणत्याही सावकाराला ऋणकोकडून किंवा इच्छुक ऋणकोकडून दिलेल्या कर्जावर किंवा देण्याचा इरादा असलेल्या कर्जावर चक्रवाढ व्याजाच्या रुपाने कोणतीही रक्कम घेता येणार नाही किंवा ऋणकोला ज्या शर्तीवर कर्ज दिले असेल त्या शर्तीअनुसार नियत दिनांकाला रकमेचे प्रदान करण्यात ऋणकोने कोणतीही कसूर केल्यास त्यासाठी पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने व्याजाच्या रूपाने कोणतीही रक्कम घेता येणार नाही :

परंतु अशा कसुरीच्या बाबतीत, सावकाराला देय रकमेवर, ती ज्या दिनांकाला प्रदानासाठी देय होईल त्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ती प्रत्यक्षात ज्या दिनांकाला देण्यात आली असेल त्या दिनांकाला संपणाऱ्या कालावधीसाठी मुद्दलाच्या बाबतीत देय असलेल्या दरापेक्षा अधिक नसेल इतक्या दराने सरळ व्याज आकारता येईल.]

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, [१][राज्य] शासनाने पोट-कलम (१) अन्वये ठरविलेल्या कमाल दरापेक्षा अधिक दरांनी व्याज देण्याबद्दल सावकार व ऋणको या दोघांत झालेला करार [४][आणि पोट-कलम (१-क) च्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेला कोणताही करारनामा कायदेशीर असणार नाही.]

[५][ (३) पोट-कलम (१) अन्वये [१][राज्य] शासनाने ठरविलेल्या कमाल दरापेक्षा अधिक दराने [६][कोणताही सावकार किंवा कलम २, खंड (९), उप-खंड (छ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्जे देणारी व्यक्ती ऋणकोकडून व्याजाची लेखी किंवा तोंडी मागणी करील किंवा ते आकारील किंवा त्याजकडून घेईल] त्या बाबतीत कलम ३४ च्या प्रयोजनाकरिता तिने या अधिनियमाचे उल्लंघन केले आहे असे समजण्यात येईल.]

सावकारांनी कर्जाच्या संबंधातील खर्च आकारण्यास मनाई.

**२६.** [७][(१) कोणत्याही सावकाराने ऋणकोकडून किंवा इच्छुक ऋणकोकडून, मालमत्तेवरील हक्काचा तपास करण्यासाठी झालेला वाजवी खर्च, मुद्रांक व दस्तऐवजाची नोंदणी याबाबतचा खर्च तसेच इतर नेहमीचा प्रत्यक्ष झालेला खर्च याव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम, प्रतिभूति म्हणून किंवा गहाण म्हणून मालमत्ता देण्याबद्दलचा करार उभयपक्षांमध्ये झालेल्या करारात समाविष्ट असेल व उभयपक्षांनी असा खर्च व त्याची भरपाई देण्याचे कबूल केले असेल त्या बाबतीत किंवा ज्या बाबतीत असा खर्च व आकार मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १९८२, अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कायद्याअन्वये वसूल करता येईल त्या बाबतीत, घेता कामा नये. १८८२ चा ४.

---

[१] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] हे परंतुक सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ च्या कलम ११ अन्वये वगळण्यात आले.

[३] पोट-कलम (१-अ) हे, सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ च्या कलम १३ (अ) अन्वये दाखल करण्यात आले.

[४] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६ च्या कलम १३ (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

[५] पोट-कलम (३) हे सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७ च्या कलम ४ अन्वये दाखल करण्यात आले.

[६] "सावकार कर्जदारास व्याज आकारील किंवा त्याजकडून घेईल तर" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४(न) अन्वये दाखल करण्यात आला.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम १४ अन्वये, कलम २६ ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) हे नवीन दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून सावकाराने ऋणकोकडून किंवा इच्छुक ऋणकोकडून त्या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेला परिव्यय आकार किंवा खर्च म्हणून घेतलेली कोणतीही रक्कम सावकाराने ऋणकोकडून किंवा, यथास्थिति, इच्छुक ऋणकोकडून देय असलेले ऋण म्हणून वसुलीयोग्य असेल किंवा ती रक्कम ऋणकोला किंवा इच्छुक ऋणकोला प्रत्यक्षात दिलेल्या कर्जातून वजावट केली जाण्यास पात्र असेल.]

कर्ज अभिहस्तांकित केल्यावर द्यावयाची नोटीस व माहिती.

**२७.** (१) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर देण्यात आलेले कर्ज किंवा अशा कर्जाचे कोणतेही व्याज किंवा अशा कर्जाच्या किंवा व्याजाच्या संबंधात केलेल्या कोणत्याही कराराचा फायदा किंवा घेतलेली प्रतिभूति अभिहस्तांकितीच्या नावे करून देण्यात आली असेल त्या बाबतीत अभिहस्तांकनकर्त्याने, मग तो पैसे कर्जाऊ देणारा सावकार असो किंवा कर्ज अगोदर ज्याला अभिहस्तांकित केलेले आहे अशी कोणतीही व्यक्ती असो, अभिहस्तांकन करण्यापूर्वी—

(क) असे कर्ज व्याज, करार किंवा प्रतिभूति अधिनियमाच्या अंमलाखाली येत आहे याबद्दल अभिहस्तांकितीस लेखी नोटीस दिली पाहिजे.

(ख) अभिहस्तांकितीस या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करणे शक्य व्हावे म्हणून त्यास आवश्यक अशी सर्व माहिती पुरवली पाहिजे ; आणि

(ग) कर्जाच्या अभिहस्तांकनाबद्दल ऋणकोस लेखी नोटीस देऊन अभिहस्तांकितीचे नाव व पत्ता त्यास कळविला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी व्यक्ती, अशा उल्लंघनामुळे जिचे नुकसान होईल अशा इतर कोणत्याही व्यक्तीस नुकसानभरपाई देण्यास जबाबदार राहील.

अभिहस्तांक्रितीच्या बाबतीत अधिनियम लागू असणे.

**२८.** (१) या अधिनियमात यापुढे जी तरतूद केली असेल ती वगळता, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर सावकाराने कर्जाऊ दिलेल्या पैशाच्या संबंधात किंवा अशा रीतीने कर्जाऊ दिलेल्या पैशावरील व्याजाच्या संबंधात किंवा अशा कर्जाच्या किंवा व्याजाच्या संबंधात केलेल्या कोणत्याही कराराचे, फायद्याचे किंवा घेतलेल्या प्रतिभूतिच्या बाबतीत सावकाराकडे देय असलेले कर्ज अभिहस्तांकित करण्यात आले असेल त्या बाबतीत, अभिहस्तांकिती हा सावकार आहे असे समजण्यात येईल व या अधिनियमाच्या सर्व तरतुदी अशा अभिहस्तांकितीस जणू तो सावकार आहे असे समजून लागू होतील.

(२) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, जेव्हा कोणत्याही कारणामुळे असे अभिहस्तांकन बेकायदेशीर असेल व अशा रीतीने अभिहस्तांकित केलेल्या कोणत्याही कर्जासंबंधाने ऋणकोने पैसे भरले असतील किंवा मालमत्तेचे हस्तांतरण केले असेल त्या बाबतीत अभिहस्तांकिती हा, अशा भरण्याच्या किंवा हस्तांतरणाच्या संबंधात या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांकरिता सावकाराचा एजन्ट आहे असे समजण्यात येईल.

व्यवहार पुन्हा चालू करणे.

**२९.** त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, हा अधिनियम लागू असलेल्या कोणत्याही दाव्यात, त्याची सुनावणी एकतर्फी किंवा अन्यथा झाली असली तरी, न्यायालयाने—

(क) अगोदरचा कोणताही व्यवहार किंवा उभयपक्षांत झालेला कोणताही लेखा पुन्हा तपासला पाहिजे ;

(ख) दोन्ही पक्षांचे आपसातील लेखे घेतले पाहिजेत ;

(ग) कोणत्याही बेसुमार व्याजाबाबत ऋणकोवर आकारलेली रक्कम कमी केली पाहिजे ;

(घ) हिशेब करताना जर असे आढळून आले की, सावकारास ऋणकोकडून देय असलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम मिळाली आहे तर अशा रकमेच्या बाबतीत ऋणकोच्या बाजूने हुकूमनामा दिला पाहिजे :

परंतु, या अधिकारांचा वापर करताना न्यायालयाने—

(एक) उभयपक्षांनी किंवा जिच्यामार्फत ते हक्क सांगतात अशा कोणत्याही व्यक्तीने दाव्याच्या तारखेपासून सहा वर्षांपेक्षा आधीच्या तारखेस ज्यावरून पूर्वीचा व्यवहार बंद करून नवीन आबंधने निर्माण केली आहेत अशी कोणतीही तडजोड किंवा करार पुन्हा तपासता कामा नये ;

(दोन) एखाद्या न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्यावर परिणाम होईल अशी कोणतीही गोष्ट करता कामा नये.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनांकरिता, " बेसुमार व्याज " म्हणजे ज्या दराने व्याज घेतले असता कलम २५ च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होते असा व्याजाचा दर.

हिशेब ठेवणे व देय असलेली रक्कम ठरविणे याबाबत चौकशी.

**३०.** (१) कोणत्याही ऋणकोस कोणत्याही वेळी हिशेब घेण्याकरिता व सावकारास देणे असलेली रक्कम ठरविण्याकरिता न्यायालयाकडे अर्ज करता येईल, मग ते कर्ज देय असो वा नसो, असा अर्ज विहित नमुन्यात असला पाहिजे आणि त्यासोबत विहित फी पाठविली पाहिजे.

(२) असा अर्ज मिळाल्यावर न्यायालयाने त्या अर्जाची नोटीस सावकारास देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(३) अर्जाच्या सुनावणीसाठी ठरविलेल्या तारखेस किंवा वेळोवेळी ज्या तारखेस सुनावणी स्थगित करण्यात येईल त्या तारखेस न्यायालयाने चौकशी केली पाहिजे आणि दोन्ही पक्षांमध्ये झालेल्या व्यवहाराचा हिशेब घेऊन मुद्दल व व्याज याबद्दल ऋणकोने सावकारास देणे असलेली रक्कम शिल्लक असेल तर, ती किती हे ठरविले पाहिजे व त्याप्रमाणे आदेश दिला पाहिजे. या अधिनियमान्वये हिशेब ठेवताना न्यायालयाने कलमे १८ ते २९ [१][ आणि कलम ३१-क] यांच्या तरतुदींचे अनुसरण केले पाहिजे.

सावकारास देय असलेली रक्कम न्यायलयात ठेव म्हणून ठेवणे.

**३१.** (१) मुद्दल किंवा व्याज किंवा मुद्दल व व्याज या दोहोंच्या रूपाने सावकारास कर्जाबाबत देणे असलेली रक्कम कोणत्याही वेळी ऋणकोस देता येईल.

(२) अशा रीतीने दिलेली कोणतीही रक्कम घेण्याचे सावकार नाकारील तर ऋणकोस अशी रक्कम सावकाराच्या खाती न्यायालयात ठेव म्हणून ठेवता येईल.

(३) त्यानंतर न्यायालयाने ऋणकोकडून ठेव म्हणून रक्कम ठेवल्याची लेखी नोटीस सावकारावर बजावावयाची व्यवस्था केली पाहिजे आणि नोटीस मिळाल्यावर सावकाराने अर्ज करून कर्जाच्या बाबतीत त्यावेळी येणे असलेली रक्कम नमूद केल्यास व ठेव म्हणून ठेवलेली रक्कम स्वीकारण्याची आपली तयारी दर्शविल्यास ती रक्कम त्यास घेता येईल व तिचा प्रथम व्याजाच्या फेडीकडे विनियोग करता येईल व काही रक्कम शिल्लक राहिल्यास तिचा मुद्दलाच्या फेडीकडे विनियोग करता येईल.

(४) सावकार अशी रक्कम स्वीकारणार नाही तेव्हा न्यायलयाने तिचा प्रथम व्याजाच्या फेडीकडे व काही रक्कम शिल्लक राहिल्यास तिचा मुद्दलाच्या फेडीकडे विनियोग केला पाहिजे.

पूर्ण महिन्याचे व्याज केव्हा द्यावयाचे.

[२][**३१-क.** दोन्ही पक्षांमध्ये कोणताही करार झालेला असेल किंवा त्यावेळी कोणताही कायदा अंमलात असला तरी, कॅलेंडर महिन्याच्या सोळा तारखेपूर्वी कलम १९ अन्वये ऋणकोस विवरण किंवा पासबुक देण्यात आले असेल किंवा कलम ३० अन्वये लेखे ठेवण्यात आले असतील किंवा कलम ३१ अन्वये कर्जाच्या संबंधात ऋणकोने सावकारास कर्ज फेडण्यासाठी रक्कम दिली असेल त्या बाबतीत व्याजाच्या रक्कमेचा हिशेब, व्याज अशा महिन्याच्या पंधरा दिवसांबद्दल देणे आहे असे समजून केला पाहिजे ; आणि त्या दिनांकानंतरच्या कोणत्याही दिवशी असे विवरणपत्र किंवा पासबुक देण्यात आले असेल किंवा लेखे ठेवण्यात आले असतील किंवा कर्ज फेडण्यासाठी रक्कम देण्यात आली असेल तर, अशा कोणत्याही दिवशी असे विवरणपत्र किंवा पासबुक देण्यात आले तरी किंवा असे लेखे घेण्यात आले तरी किंवा अशी रक्कम देण्यात आली तरी अशा व्याजाचा हिशेब, व्याज संबंध कॅलेंडर महिन्याबद्दल देणे आहे असे समजून केला पाहिजे.]

---

[१] हे शब्द सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ५ अन्वये दाखल करण्यात आले.

[२] कलम ३१-अ हे सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ६ अन्वये दाखल करण्यात आले.

**३२.** (१) ज्यात कर्जाची प्रत्यक्ष रक्कम नमूद केलेली नसेल किंवा ज्यात अशी रक्कम चुकीची दिलेली असेल असे कोणतेही वचनपत्र, पोच, बंधपत्र किंवा इतर लेख कोणत्याही सावकाराने करून घेता कामा नये. तसेच ज्या लेखात तो करून दिल्यानंतर मजकूर भरण्याकरिता कोरी जागा सोडली आहे असा कोणताही लेख करून घेता कामा नये. बंधपत्र इत्यादीत चुकीच्या रकमेची नोंद करणे हा अपराध असणे.

(२) जी व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील ती अपराधसिद्धीनंतर रु. ५००० पर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या किंवा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

[१][**३२-क.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअनुसार किंवा त्या तरतुदींच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा कोणत्याही दस्तऐवजातील कोणत्याही महत्त्वाच्या तपशीलाबाबत एखादे विधान खोटे आहे हे माहीत असूनही बुद्धीपुरस्सर असे खोटे विधान जी कोणतीही व्यक्ती करील ती, अपराधसिद्धीनंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. खोटे विधान करण्याबद्दल शास्ती.

**३२-ख.** जो कोणी– खोट्या नावाने लायसन्स मिळविणे, कायदेशीर लायसन्स शिवाय सावकारीचा व्यवसाय करणे आणि खोट्या नावाने सावकारीचा व्यवसाय करताना करारनामा करणे याबद्दल शास्ती.

(क) जे त्याचे खरे नाव नाही अशा नावाने लायसन्स मिळवील किंवा अशा प्रकारे मिळविलेल्या लायसन्सअन्वये सावकारीचा व्यवसाय करील, किंवा ;

(ख) एखाद्या जागी सावकारीचा व्यावसाय करण्यास त्याला प्राधिकृत करणारे कायदेशीर लायसन्स धारण केल्याशिवाय अशा कोणत्याही जागी असा व्यवसाय करील, किंवा ;

(ग) सावकारीचा व्यवसाय करताना कायदेशीर लायसन्सशिवाय किंवा जे त्याचे खरे नाव नाही अशा नावाने मिळविलेल्या लायसन्सअन्वये कोणताही करार करील, तो अपराधसिद्धीनंतर,

(१) पहिल्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत असू शकेल अशा कोणत्याही प्रकारच्या कैदेस किंवा एक हजार पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल, आणि

(२) दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी, खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्तीव्यतिरिक्त किंवा त्या शास्तीऐवजी, जेथे अशी व्यक्ती ही कंपनी नसेल तेथे, दोन वर्षांपेक्षा कमी नसेल अशा कैदेस आणि जेथे ती व्यक्ती ही कंपनी असेल तेथे कमीत कमी पाच हजार रुपयांच्या दंडास पात्र ठरेल.]

**३३.** (१) जी व्यक्ती ऋणकोने सावकारास देणे असलेल्या कर्जाच्या वसुलीकरता ऋणकोस त्रास देईल किंवा त्रास देण्यास प्रोत्साहन देईल तिला, अपराधसिद्धीनंतर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची किंवा दोन्ही शिक्षा होतील. विनयभंग केल्याबद्दल शास्ती.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनाकरिता जी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस जे करण्याचा तिला हक्क आहे असे कोणतेही कृत्य तिने करू नये किंवा जे न करण्याचा तिला हक्क आहे असे कोणतेही कृत्य तिने करावे या हेतूने–

(क) अशा व्यक्तीस अडथळा करील किंवा तीवर बळाचा वापर करील किंवा तीस धमकी देईल, किंवा ;

---

१ ३२-अ व ३२-ब ही कलमे सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम १५ अन्वये दाखल करण्यात आली.

(ख) अशा व्यक्तीचा एका जागेहून दुसऱ्या जागी पाठलाग करील किंवा तिच्या मालकीच्या किंवा ती व्यक्ती वापरीत असलेल्या कोणत्याही मालमत्तेत ढवळाढवळ करील किंवा तिला तिचा उपभोग घेऊ देणार नाही किंवा तिचा उपभोग घेण्यास तीस अडथळा करील, किंवा ;

(ग) ज्या घरात किंवा इतर ठिकाणी अशी व्यक्ती राहत असेल किंवा काम करीत असेल किंवा व्यापार करीत असेल किंवा तेथे असेल अशा कोणत्याही घराच्या किंवा इतर जागेच्या जवळपास भटकत राहील किंवा ती सतावली जाईल किंवा घाबरून जाईल या हेतूने कोणतेही कृत्य करील ; तर ती व्यक्ती अशा व्यक्तीस त्रास देते असे समजण्यात येईल :

परंतु, जी व्यक्ती अशा घरी किंवा जागी केवळ माहिती मिळविण्याकरिता किंवा देण्याकरिता जाईल ती व्यक्ती त्रास देते असे समजण्यात येणार नाही.

[१] * * * * * *

शास्तीसंबंधी सर्वसाधारण तरतुदी.

**३४.** जी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करण्यात कसूर करील किंवा त्यांचे उल्लंघन करील ती, त्याबाबत या अधिनियमात विशिष्ट शास्तीची तरतूद नसल्यास पुढील शिक्षांस पात्र होईल :—

[२][ (क) पहिल्या अपराधासाठी [३][एक वर्षापर्यंत] असू शकेल इतक्या कारावासाची किंवा [३][५,००० रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा ;

(ख) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी दोहोंपैकी कोणत्याही प्रकारची, [४][दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा १,००० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा]. ].

महामंडळ, इत्यादीकडून झालेले अपराध.

**३५.** ह्या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणारी व्यक्ती अविभक्त हिंदु कुटुंब [५] * * [६][ किंवा कंपनी] किंवा असंस्थापित संस्था असेल तर, अशा कुटुंबाच्या, [७][ * [८] * कंपनीच्या] किंवा संस्थेच्या धंद्याच्या व्यवस्थेबद्दल जबाबदार असलेली व्यक्ती अशा उल्लंघनाबद्दल दोषी समजण्यात येईल.

---

[१] पोट-कलम (२) हे, सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ३ अन्वये वगळण्यात आले.

[२] मूळ खंड (अ) ते (क) ऐवजी (अ) व (ब) हे खंड सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ७ अन्वये दाखल करण्यात आले.

[३] "दोन महिन्यांची" आणि "५०० रुपये" या शब्दांऐवजी हे शब्द सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम १७ (अ) अन्वये दाखल करण्यात आले.

[४] "पराकाष्ठा सहा महिने कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम १७ (ब) अन्वये दाखल करण्यात आला.

[५] "किंवा बँक" हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये वगळण्यात आले.

[६] हे शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १० अन्वये दाखल करण्यात आले.

[७] हा शब्द सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १० अन्वये दाखल करण्यात आला.

[८] "किंवा बँकेच्या" हे शब्द सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १२ अन्वये वगळण्यात आले.

[१][ **३५-क.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ यात काहीही असले तरी– विवक्षित अपराध दखल घेण्यायोग्य असणे.

(अ) कलम ५ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेले अपराध, आणि

(ब) कलम ३३ अन्वये शिक्षापात्र असलेले अपराध ;

हे दखल घेण्यायोग्य असतील.]

[२][ **३५-ख.** कलम १८ किंवा कलम १९ याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची कोणतेही न्यायालय, निबंधकाच्या पूर्वमंजुरीशिवाय दखल घेणार नाही. विवक्षित अपराधांची दखल घेणे.

[३] * * * * * * ]

**३६.** त्यावेळी कोणताही कायदा अंमलात असला तरी, जो जातीने जमीन कसतो व ज्याचे कर्ज १५,००० रुपयांपेक्षा अधिक नाही अशा ऋणकोस सावकाराच्या वतीने केलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना अटक किंवा कैद करण्यात येणार नाही-मग असा हुकूमनामा हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर काढलेला असो. पैसासंबंधीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना ऋणको शेतकऱ्यांना अटक किंवा कैद करण्यास बंदी.

१९४८ चा मुंबई सदुसष्ट. **स्पष्टीकरण.**—" जातीने (जमीन) कसणे " यास. [४][मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, कलम २, खंड (६) ] मध्ये त्यास नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असेल.

१८६० चा पंचेचाळीस. **३७.** या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार काम करणारा [५][शासनाचा] कोणताही अधिकारी भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे समजण्यात येईल. प्रत्येक अधिकारी लोकसेवक असणे.

---

[१] कलम ३५-अ हे सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ४ अन्वये दाखल करण्यात आले.

[२] कलमे ३५-ब व ३५-क हे सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (पी) अन्वये दाखल करण्यात आली.

[३] कलम ३५-क हे सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम १८ अन्वये वगळण्यात आले.

[४] " मुंबई कुळवहिवाट अधिनियम, १९३९, कलम २, खंड (११) " या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (क्यू) अन्वये दाखल करण्यात आला.

[५] हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये बदली दाखल करण्यात आला.

[१][सन १९४७ चा अधिनियम क्रमांक २८ याच्या तरतुदींची व्यावृत्ती.

**३८.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमुळे मुंबई शेतकरी सहाय्य अधिनियम, [२][१९४७] याच्या [३][किंवा कर्जदार शेतकऱ्यांना सहाय्य देण्याबाबत तत्सम स्वरूपाचा अंमलात असलेला कोणताही इतर कायदा] याच्या तरतुदींना बाध येणार नाही आणि ज्या कर्जाबाबत या अधिनियमान्वये [३][किंवा, [यथास्थिति, उक्त कायद्यान्वये] कर्जाच्या तडजोडीसंबंधी काम चालविणे शक्य असेल त्या कर्जाबाबत कोणताही दावा अगर कारवाई कोणत्याही न्यायालयाने दाखल करून घेता किंवा चालविता कामा नये.

१९४७ चा मुंबई अठ्ठावीस.

अधिकारांच्या प्रत्यायोजनांचा राज्य शासनाचा अधिकार.

[४][ **३८-क.** राज्य शासनास, या अधिनियमान्वये किंवा तदनुसार त्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.]

नियम.

**३९.** (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी [५][राज्य] शासनास नियम करता येतील.

(२) विशेषकरून व वरील तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा नियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींची तरतूद करता येईल :—

(क) कलम ४ अन्वये ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना ;

[६][ (ख) कलम ६ अन्वये लायसन्ससाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, त्यात समाविष्ट करावयाचा आणखी तपशील आणि लायसन्स फी भरण्याची रीत ;]

(ग) लायसन्सचा नमुना व त्याच्या शर्ती व कलम ७ अन्वये [७][ लायसन्स फी भरावयाची रीत] ;

[८][ * * * * * * ]

[९][ (घ-ख) सावकाराकडे गहाण ठेवलेल्या मालमत्तेसंबंधीचे दावे मागवण्यासाठी कलम १३-ख च्या पोट-कलम (४) अन्वये नोटीस प्रसिद्ध करावयाची रीत ;]

---

[१] "१९३९ चा अधिनियम क्रमांक २८" या शब्दांऐवजी हे शब्द सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम ३, दुसऱ्या अनुसूचीअन्वये दाखल करण्यात आले.

[२] "१९३९" या आकड्यांऐवजी हा आकडा वरील अधिनियमान्वये दाखल करण्यात आला.

[३] हे शब्द सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (आर) अन्वये दाखल करण्यात आले.

[४] हे कलम सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १३ अन्वये दाखल करण्यात आले.

[५] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[६] मूळ खंडाऐवजी हा खंड सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ११ (१) अन्वये दाखल करण्यात आले.

[७] "लायसन्स फी भरावयाची रीत आणि कलम ७ अन्वये करावयाच्या संक्षिप्त चौकशीची कार्यरीती" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७६, कलम १९ (अ) अन्वये दाखल करण्यात आला.

[८] १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम ६ अन्वये खंड (क-अ) वगळण्यात आला.

[९] हे उप-खंड वरील अधिनियमाच्या कलम १९ (ब) अन्वये दाखल करण्यात आले.

(घ) कलम १८, पोट-कलम (१) अन्वये ठेवावयाची रोकडवही व खातेवही यांचा नमुना व तो ज्या रीतीने ठेवण्यात येईल ती रीत आणि पोट-कलम (४) अन्वये विहित करावयाचा इतर तपशील ;

(ङ) कलम १९, पोट-कलम (१) अन्वये पुरवावयाच्या, सादर करावयाच्या [१][किंवा पाठवावयाच्या] हिशोबांच्या विवरणपत्रांचा [१][व पासबुकाचा] नमुना व ते ज्या तारखेपूर्वी देण्यात येईल, सादर करण्यात येईल [१][किंवा पाठविण्यात येईल] ती तारीख, पोट-कलम (२) अन्वये द्यावयाची फी, आणि पोट-कलम (३) अन्वये द्यावयाची खर्चाची रक्कम ;

[२][ (ङ-ङ) कलम १९-क अन्वये ज्या दराने व ज्या रीतीने फी वसूल करता येईल ते दर व ती रीत ;]

(च) कलम ३०, पोट-कलम (१) अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना व द्यावयाची फी ;

(छ) या-अधिनियमान्वये विहित केलेली किंवा विहित करण्यात येईल अशी कोणतीही इतर गोष्ट किंवा या अधिनियमात ज्या गोष्टीबद्दल तरतूद केलेली नाही किंवा केलेली तरतूद अपुरी आहे आणि या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता ज्याबाबत तरतूद करणे [३][राज्य] शासनास आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही गोष्ट.

(३) या कलमान्वये केलेले नियम, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(४) या कलमान्वये केलेले नियम, ते केल्यावर लगतनंतरच्या अधिवेशनात [३][राज्य] विधानमंडळाच्या प्रत्येक [४][सभागृहापुढे] ठेवण्यात येतील आणि ते दोन्ही [४][सभागृहामध्ये] संमत झाल्यास, ठरावाद्वारे फेरफार केले जाण्यास किंवा रद्द केले जाण्यास पात्र असतील आणि असे नियम, **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यानंतर, तदनुसार त्यात फेरफार करण्यात आला आहे किंवा ते रद्द करण्यात आले आहेत असे समजण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई ५०, १९३४ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम तेरा, १९३७ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम चार, १३४९ फसली चा हैद्राबाद पाच, १९५६ चा हैद्राबाद अठ्ठेचाळीस, १९४७ चा मुंबई एकतीस, १९५९ चा मुंबई पन्नास.

निरसन व व्यावृत्ती

[५][**४०.** मुंबई सावकार (एकत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९ या अन्वये हा अधिनियम राज्याच्या ज्या भागास लागू करण्यास आला त्या भागात ते अंमलात आल्यानंतर राज्याच्या विदर्भ प्रदेशात लागू असलेले मध्य प्रांत व वऱ्हाड सावकार अधिनियम, १९३४ आणि मध्यप्रदेश व वऱ्हाड कर्जदारांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, १९३७ आणि राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रास लागू असलेले, हैद्राबाद सावकार अधिनियम, १३४९ फसली आणि हैद्राबाद सावकाराच्या लायसन्सच्या वैद्यतेबाबत अधिनियम, १९५६ आणि राज्याच्या कच्छ क्षेत्रास लागू केलेला मुंबई सावकार अधिनियम, १९४६ हे निरसित होतील :

परंतु या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाच्या निरसनामुळे पुढील गोष्टीवर परिणाम होणार नाही—

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाचे पूर्वप्रवर्तन किंवा तद्न्वये यथोचितरित्या केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट ;

(ख) निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये संपादन केलेला किंवा मिळविलेला कोणताही हक्क किंवा विशेषाधिकार किंवा पत्करलेले कोणतेही आबंधन किंवा दायित्त्व ;

---

[१] हे शब्द सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७, कलम ८ अन्वये दाखल करण्यात आले.

[२] हा खंड सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ११ (२) अन्वये दाखल करण्यात आला.

[३] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द विधी अनुकूल आदेश, १९५० अन्वये दाखल करण्यात आला.

[४] मूळ शब्दाऐवजी हे शब्द वरील आदेशान्वये दाखल करण्यात आले.

[५] हे कलम सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (एस) अन्वये दाखल करण्यात आले.

(ग) अशा प्रकारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात मिळालेली कोणतीही शास्ती, केलेली जप्ती किंवा दिलेली शिक्षा ; किंवा

(घ) उपरोक्त कोणताही हक्क, विशेषाधिकार, आबंधन, दायित्व, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा या बाबतीत कोणतीही चौकशी कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना आणि मुंबई सावकार (एकत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९ हा जणू काही संमत झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा करता येईल ;

आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकास अधीन राहून, अशा प्रकारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही (त्यात केलेले नियम, दिलेले अधिकार व सोपविलेले अधिकार तसे ठेवलेल्या नोंदवह्या, प्रमाणपत्रे, दिलेली लायसन्स व काढलेल्या अधिसूचना धरून) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, ती या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीअन्वये केलेली कारवाई किंवा गोष्ट आहे असे समजण्यात येईल व तीत या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या कोणत्याही उपाययोजनेद्वारे फेरबदल करण्यात, सुधारणा करण्यात किंवा अधिक्रमित करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.]

[१][ * * *]